| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ०३ रा | मंगळवार दिनांक ०३ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

येरमाळा(प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत रणजित नवनाथ जाधवर, वय ४० वर्षे, रा. रत्नापूर ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२८.०२.२०२६ रोजी एनएच ५२ रोडवरील रत्नापूर पाटीजवळल असलेले बांगर बंधु पान स्टॉल मध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा डायरेक्टर पान मसाला, प्रिमीयम राजनिवास पानमसाला, केसर युक्त विमल पान मसाला, प्रिमीयम रिच रिफ्रेशींग टेस्टमसाला असा एकुण ६,१०० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला येरमाळा पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-१२३, २२३,२७४, २७५ सह अन्न सुरक्षा अन्वये येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

तसेच दुसऱ्या एका घटनेत उमरगा पोलीस ठाणे: शाहरुख रा. मुळज रोड हमीद नगर उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२८.०२.२०२६ रोजी मुळज रोड हमीदनगरआपल्या दुकानात उमरगा येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा विमल पान मसाला, व्ही १ टोबॅको असा एकुण १,७६० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला उमरगा पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- २२३,२७४, २७५ सह अन्न सुरक्षा अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### लॉजवर घेवून जावून गेला लैंगिक अत्याचार

परंडा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २४ वर्षीय महिला दि१५.१०.२०२५ रोजी एका गावातील एका तरुणाने लॉजवर घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला.शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२८.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(२)(म), ३३३, ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### स्कुटीची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी निशा किरण साठे, वय २६ वर्षे, रा. वासुदेव गल्ली तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ९०,००० किंमतीची ज्युपीटर स्कुटी ही दि.२७.०२.२०२६ रोजी फिर्यादी यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-तुळजापूर यांनी दि.२७.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद; विविध विभागांच्या स्टॉलवर नागरिकांची गर्दी



धाराशिव (जिमाका) -जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आज लेडीज क्लब, धाराशिव येथे विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन शैलेश ब्रम्हे,न्यायमूर्ती,मुंबई उच्च न्यायालय यांच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे न्यायाधीश यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक रितू खोखर,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्या.भाग्यश्री पाटील,जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड.अमोल वरुडकर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री देव होत्या.

महाशिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,जिल्हा न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालयाचा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग,(वार रूम - मध्यवर्ती नियंत्रण कक्ष),जिल्हा वाहतूक शाखा पोलीस विभाग,राज्य मार्ग परिवहन महामंडळ,उपविभागीय अधिकारी कार्यालय,जिल्हा कृषी अधिकारी व कृषी विकास अधिकारी कार्यालय,जिल्हा परिषद,शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय,आरोग्य विभागाचा राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम,मोबाईल मेडिकल हॉस्पिटल,आयुष्मान भारत, ॲनिमियामुक्त भारत अभियान,रेशीम विकास विभाग,महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र,महिला व बाल विकास विभाग,महिला बालकल्याण विभाग,पशुसंवर्धन विभाग, मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियान, शिक्षण विभाग,येडाई व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र (येरमाळा), अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना,सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय तसेच जिल्हा कौशल्य,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नोंदणी व मुद्रांक विभाग, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम,जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा रक्तदान शिबिर,तहसील कार्यालय,धाराशिव,जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाचा राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम,व्हाइट गोल्ड चॉकी सेंटर,खामकरवाडी,महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना/विकसित भारत जी राम जी, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचा स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा - २,वीज वितरण कंपनीची सौर ऊर्जा योजना यांसह विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते.

या सर्व स्टॉलना नागरिक,महिला व लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात भेट देऊन योजनांची सविस्तर माहिती जाणून घेतली.अनेक पात्र लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्टॉलवर विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात आले.

विधी सेवा महाशिबिराचा उद्देश सर्वसामान्यांना मोफत व त्वरित कायदेविषयक मदत उपलब्ध करून देणे,नागरिकांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे,पात्रांना मोफत विधी साहाय्य देणे तसेच प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीमार्फत निकाली काढण्यास प्रोत्साहन देणे हा होता.

त्याचबरोबर शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत वंचित, गरजू,महिला,ज्येष्ठ नागरिक,दिव्यांग व इतर दुर्बल घटकांपर्यंत योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचवून सर्वांसाठी न्याय ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा या उपक्रमामागील मूलभूत हेतू होता.

## १३ महिन्यांच्या चिमुकलीचा चुलत्याकडून खून २४ तासांत गुन्ह्याचा उलगडा

धाराशिव (प्रतिनिधी)- तामलवाडी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८.०२.२०२६ रोजी महादेव माने (रा. गवळेवाडी) यांनी आपल्या १३ महिन्यांच्या मुलीला अज्ञात व्यक्तीने घरातून पळवून नेल्याची तक्रार दिली. सदर तक्रारीवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात गु.र.नं. २९/२०२६ कलम १३७(२) बी.एन.एस. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, सदर गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर करीत असताना, मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार पीडित मुलीला तिचा चुलता शंकरेश्वर माने यानेच पळवून नेल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार संशयितास ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने दिनांक २७.०२.२०२६ रोजी पहाटेच्या सुमारास पीडित मुलीला घरातून उचलून नेले. शेतात तिचा गळा दाबून खून केला व त्यानंतर कोयत्याच्या सहाय्याने मृतदेहाचे तुकडे करून पोत्यात भरून जवळील चारीमध्ये पुरून टाकले, असे त्याने सांगितले. आरोपीने दिलेल्या माहितीवरुन दोन पंचांसमक्ष पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. प्राथमिक तपासात असे आढळून आले आहे की, आरोपीच्या भावाची पत्नीचे अनैतिक संबध परपुरुषासोबत असल्याचे कारणावरून त्याच्या मनात संताप होता. तसेच, पीडित मुलगी आपल्या भावाची नसल्याचा संशय त्याला आल्याने रागाच्या भरात त्याने सदर कृत्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास मा. पोलीस अधीक्षक रितू खोखर मॅडम, अप्पर पोलीस अधीक्षक शफाकत आमना मॅडम व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर, पोलीस हवालदार जुबेर काझी, आकाश सुरनर, नितीन भोसले, पोलीस अंमलदार सूरज नरवडे, नझीर बागवान, उमेश माने व तुराब शेख, मनोज गोबाडे यांच्या पथकाने २४ तासांच्या आत उलगडला आहे.

## पोदार प्रेप, धाराशिव येथे दंत तपासणी व मार्गदर्शन सत्र संपन्न



पोदार प्रेप धाराशिव येथे नर्सरी ते सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी दंत तपासणी व मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. स्नेहल बेदमुथा यांनी उपस्थित राहून सर्व विद्यार्थ्यांची दातांची तपासणी केली व योग्य दंतस्वास्थ्याबाबत मार्गदर्शन केले.

सेमिनारमध्ये त्यांनी लहान मुलांना चॉकलेट, जंक फूड आणि केक यांसारखे गोड पदार्थ कमी प्रमाणात खावेत, असे सांगितले. तसेच दिवसातून दोन वेळा दात घासणे, प्रत्येक जेवणानंतर तोंड स्वच्छ धुणे आणि नियमित दंत तपासणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन प्रशासकीय अधिकारी श्री. जीवन कुलकर्णी सर यांनी उत्कृष्टरीत्या केले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका रेशमा संकपाळ मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानून विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात दंतस्वच्छतेचे महत्त्व पाळण्याचे आवाहन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये दंतस्वास्थ्याबाबत जागरूकता निर्माण झाली.

## अवैध एमडी (मेफेडोन) अंमली पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, बालाजी नवनाथ सोनवणे, वय ४५ वर्षे, रा. गारभवानी इंदिरा नगर झोपडपट्टी परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि. २८.०२.२०२६ रोजी परंडा ते मुंगशी जाणाऱ्या रोडवर गफार मुजावर यांच्या शेताजवळ परंडा येथे १४,५१० ग्रॅम वजनाचे प्रतिबंधीत असलेला एमडी (मेफेडोन) नावाचा अंमली पदार्थ असा एकुण २,१७,६५० किंमतीचा मोटरसायकल सह एकुण २,३२,६५० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला परंडा पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी अंमली पदार्थ साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम ८(क), २१ (ब) गुंगीकारक औषधीद्रवये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविणार




धाराशिव (प्रतिनिधी)- राज्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविणार ग्रामपंचायतींसाठी पाच ते २ कोटींचे पुरस्कार, आरोग्य सुधारणा घडवून आणण्यावर भरराज्यात 'माझ गांव, आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. दर आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंतच्या या कालावधीत अभियान राबविण्यात येईल. अभियानात गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंयार्तीना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून मानांकन व प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहे.

राज्यातील आरोग्य सेवांमध्ये गुणात्मक सुधारणा करणे व प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या मुलभूत सुविधा निर्माण करून देण्यासाठी, संसर्ग व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करून त्यांचे निर्मूलन करणे आणि माता व बालकांचे आरोग्यमान उंचावणे या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात नागरिकांच्या जीवनशैलीत, आहारात बदल करण्यासाठी प्रोत्साहन, प्रतिबंधात्मक उपाययोजना, वेळेवर उपचार व पुनर्वसन हे चार स्तंभ असतील.गावातील नागरिकांना सदृढ आणि सशक्त करण्यासाठी माझं गाव आरोग्य संपन्न गांव अभियान सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अभियानाच्या अंमलबजावणीत आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय हे प्रमुख घटक असतील. या अभियानातून सामाजिक बांधिलकी, लोकसहभाग, लोककेंद्रीत नियोजन व शाश्वत आरोग्य व्यवस्थापनाच्या दिशेने पाऊल टाकण्यात येणार आहे. या माध्यमातून आयुष्मान भारत, राष्ट्रीय आरोगय अभियान, पोषण अभियान, स्वच्छ भारत अभियान, सस्टनेबल डेव्हलपमेंट गोल्स-३ यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

अभियानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा व तालुका यंत्रणा, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र या ठिकाणी कार्यरत आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक-सेविका व आशा तसेच ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग घेतला जाणा आहे. एकात्मिक कार्यप्रणाली व पारदर्शक मूल्यांकनाच्या आधारे गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्यांना ग्रामपंचायतींना 'आरोग्य संपन्न ग्राम' म्हणून पुरस्कार देण्यात येणार आहे.या अभियानाच्या अमंलबजावणी व संनियत्रणासाठी आरोग्य मंत्री यांच्या अध्यतेखाली राज्य आरोग्य संपन्न गाव संनियंत्रण समितीसह राज्यस्तरीय आरोग्य संपन्न गाव कृती समिती, जिल्हास्तरीय आरोग्य संपन्न गाव अभियान समिती, तालुकास्तरीय व ग्रामपंचायतस्तरीय कृती समिती अशा पाच समित्यांची स्थापना करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतस्तरीय समिती गाव आरोग्य कृती आराखडा तयार करेल. त्यामध्ये आरोग्य सेवांची स्थिती, अडचणी, व सुधारणा उपाय, आरोग्य ग्रामसभा, स्वच्छता अभियान, पोषण जागरूकता, स्वमूल्यमापन चाचणी, आरोग्य नकाशे, कार्यक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवणे अशा गोष्टींचा समावेश असेल. यासाठी गावांचे स्वमूल्यमापन ते राज्यस्तरीय अंतिम मुल्यमापन केले जाईल. यातून गावांना प्रथम क्रमांकासाठी जिल्हास्तर, विभाग आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे पंचवीस लाख, एक कोटी व पाच कोटींचे पुरस्कार असेल. दुसऱ्या क्रमांकासाठी वीस लाख, ७५ लाख आणि ३ कोटी तर तिसऱ्या क्रमांकासाठी १५ लाख, ५० लाख आणि दोन कोटी रुपयांचा पुरस्कार दिला जाईल. उपआरोग्य केंद्राला जिल्हास्तर प्रथम क्रमांकासाठी पाच लाख, राज्यस्तरासाठी २५ लाख, प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी १० लाख व राज्यस्तरासाठी ५० लाख.ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयाला राज्यस्तरावर ७५ लाखांचा पुरस्कार दिला जाईल. याशिवाय पंचायत समितीला राज्यस्तरावर अनुक्रमे २ कोटी, दीड कोटी व एक कोटी पंचवीस लाखांचा पुरस्कार दिला जाईल. तर जिल्हा परिषदेला राज्यस्तरासाठी अनुक्रमे पाच, तीन व दोन कोटी रुपयांचा पुरस्कार दिला जाईल. त्यासाठी दरवर्षी ८० कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पाकिटावर वाचून वागावे

आपल्या देशात अनेक पाकिटावर माहिती लिहीलेली असते. त्यात पदार्थात कोणते घटक आहेत. किती आहेत. त्याच प्रमाणे सिगारेट, तंबाखु सारख्या अनेक पाकिटावर हानीकारक असल्याचे लिहीले असते. ते तरी वाचले पाहिजे व त्यापासून सावध झाले पाहिजे. आपल्या देशात तसे होत नाही. भारतातील सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात सध्या एक अत्यंत कळीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पाकीटबंद खाद्यपदार्थांच्या आवरणावर, म्हणजेच 'पॅकेट'वर समोरच्या बाजूला त्यातील घातक घटकांविषयी स्पष्ट इशारा देणारी प्रणाली लागू करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानके प्राधिकरण अर्थात 'एफएसएसएआय'ला नुकतेच काही निर्देश दिले आहेत. हे निर्देश महत्त्वाचे ठरतात. याचे कारण म्हणजे, आजचा सामान्य उपभोक्ता जाहिरातींच्या झगमगाटात स्वतःचे आरोग्य गहाण ठेवत आहे. साखर, मीठ आणि घातक चरबीयुक्त पदार्थांच्या वाढत्या वापरामुळे भारतीय समाज एका अदृश्य महामारीच्या विळख्यात अडकत चालला असून, त्यावर अंकुश ठेवण्यासाठी कायद्याचा बडगा उगारणे गरजेचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'फ्रंट ऑफ पॅक लेबलिंग' म्हणजेच पाकीटबंद पदार्थांच्या दर्शनी भागावर त्यातील पोषक मूल्यांची माहिती देण्याबाबत चर्चा सुरू होत्या. मात्र, दुर्दैवाने अन्न प्रक्रिया उद्योगाचा दबाव आणि धोरणात्मक धरसोडवृत्ती यामुळे हा विषय प्रलंबित राहिला. आता सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करून चार आठवड्यांच्या आत उत्तर मागितल्यामुळे प्रशासकीय यंत्रणेला आपली सुस्ती झटकून कामाला लागावे लागेल. न्यायालयाचे हे निरीक्षण अत्यंत मार्मिक आहे की, अशा प्रकारची लेबलिंग प्रणाली सार्वजनिक आरोग्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. जेव्हा एखादा ग्राहक चिप्सचे पाकीट किंवा शीतपेयाची बाटली खरेदी करतो, तेव्हा त्याला त्यातील 'ट्रान्स फॅट', सोडियम किंवा साखरेचे प्रमाण किती घातक आहे, हे तांत्रिक भाषेत वाचण्याऐवजी एका साध्या आणि स्पष्ट चिन्हाद्वारे समजणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. भारतातील लठ्ठपणाची आकडेवारी पाहिली तर परिस्थिती किती भयावह आहे याची कल्पना येते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या ताज्या अहवालानुसार, देशातील सुमारे २४ टक्के महिला आणि २३ टक्के पुरूष अतिरिक्त वजन किंवा लठ्ठपणाच्या समस्येने ग्रस्त आहेत. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे लहान मुलांमधील लठ्ठपणाचे प्रमाण. २०१५-१६ मध्ये पाच वर्षांखालील मुलांमध्ये हे प्रमाण २.१ टक्के होते, जे आता ३.४ टक्क्यांवर पोहोचले आहे. 'वर्ल्ड ओबेसिटी ॲटलास २०२४' च्या अंदाजानुसार, २०३५ पर्यंत भारतातील लठ्ठ मुलांची संख्या ८.३ कोटींहून अधिक होऊ शकते. ही आकडेवारी भविष्यातील एका मोठ्या आरोग्य संकटाची नांदी आहे. ज्या देशात कुपोषणाचे आव्हान अजून पूर्णपणे पेललेले नाही, तिथे आता मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यासारखे 'अति-पोषणा'मुळे निर्माण होणारे आजार घरोघरी पोहोचत आहेत. या सर्व समस्यांच्या मुळाशी आहेत ते म्हणजे 'अल्ट्रा-प्रोसेस्ड' खाद्यपदार्थ. २००९ ते २०२३ या काळात अशा पदार्थांच्या विक्रीत तब्बल १५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. कंपन्या आपल्या उत्पादनांची विक्री वाढवण्यासाठी आक्रमक मार्केटिंगचा आधार घेतात. 'आरोग्यदायी', 'नैसर्गिक' किंवा 'जीवनसत्त्वयुक्त' असे दावे करून ग्राहकांची दिशाभूल केली जाते. मात्र, प्रत्यक्षात त्या पदार्थांमध्ये चव वाढवण्यासाठी टाकलेले मीठ आणि साखरेचे प्रमाण शरीराच्या मर्यादेबाहेर असते. अनेकदा लेबलवरील माहिती इतक्या बारीक अक्षरात असते की ती वाचणे सामान्य माणसाला अशक्य होते. म्हणूनच, 'लेबलब्लाइंड सोल्युशन्स' सारख्या संस्थांनी केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की, बाजारपेठेतील एक तृतीयांश उत्पादने ही दिशाभूल करणाऱ्या दाव्यांवर आधारित आहेत. नियमन करणाऱ्या संस्थांच्या भूमिकेवरही आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने भ्रामक जाहिरातींविरुद्ध मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असली तरी, पोषणमूल्यांच्या सीमारेषेबाबत अजूनही स्पष्टता नाही. एखादा पदार्थ किती प्रमाणात साखर असल्यास 'अस्वास्थ्यकर' मानला जावा, याचे ठोस निकष जोपर्यंत कायद्याने बंधनकारक होत नाहीत, तोपर्यंत कंपन्या पळवाटा शोधत राहणार. चिलीसारख्या देशाने यावर अत्यंत प्रभावी उपाय शोधला आहे. त्यांनी अशा पदार्थांवर काळ्या रंगाचे स्पष्ट 'स्टॉप साइन' लावले आहे, ज्यामुळे लहान मुलांनाही समजू शकते की हा पदार्थ त्यांच्यासाठी घातक आहे. भारतासारख्या देशात, जिथे साक्षरतेचे प्रमाण आणि भाषेची विविधता मोठी आहे, तिथे अशा साध्या आणि चित्रमय इशाऱ्याची सर्वाधिक गरज आहे. केवळ लेबल लावल्याने सर्व प्रश्न सुटतील असे नाही, परंतु ती एका मोठ्या लढाईची सुरुवात असेल. यापुढे जाऊन ज्या पदार्थांमध्ये साखर, मीठ आणि चरबीचे प्रमाण जास्त आहे, त्यांच्यावर विशेष 'पोषक तत्त्व आधारित कर' (न्यूट्रिएंट टॅक्स) लावला पाहिजे. याशिवाय, लहान मुलांना लक्ष्य करणाऱ्या डिजिटल जाहिरातींवर पूर्णपणे बंदी घातली पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात अशा जंक फूडच्या विक्रीवर मर्यादा आणणे आवश्यक आहे. सरकारचे 'पोषण अभियान' किंवा 'ईट राइट इंडिया' सारखे उपक्रम स्तुत्य आहेत, पण जोपर्यंत बाजारपेठेतील नियमन कडक होत नाही, तोपर्यंत या मोहिमांना अपेक्षित यश मिळणार नाही. उद्योग जगताच्या नफ्यापेक्षा सामान्य माणसाचे आयुष्य अधिक मौल्यवान आहे. पुर्वीची जीवनप्रणाली व सध्याची यात मोठा फरक आहे. पुर्वी सात्त्विक अन्न होते आता त्याची जागा रासायनिक अन्नपदार्थाने घेतली आहे. आता पाकिटबंद फुडचे वाढते प्रमाण आहे. चिप्स सारख्या पॅकेटचा वापर अधिक होत आहे. त्यामुळे मुलाची जाडी वाढत आहे. चालणे आवघड दिसत आहे. शरिराची उंची पेक्षा जाडी अधिक कोणत्या कारणामुळे होते याचा विचार केला पाहिजे. सिगारेटच्या पाकिटावर मराठी व इंग्रजीत लिहीले असते की, ओढण आरोग्यास हानीकारक आहे तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे लिहून तरी किती परिणाम होतो याचाही विचार केला पाहिजे. आपले कर्तव्य म्हणून आरोग्याचा सल्ला असावा व त्या सल्ल्याचे अनुकरण होणे आवश्यक आहे.

# डॉ.जनार्दन वाघमारे सरांच्या निधनाने लातूर पॅटर्नच्या विचारसूर्याचा अस्त..!



लातूरच्या इतिहासात हा दिवस काळ्या अक्षरांनी लिहिला जाईल. कारण आज एका व्यक्तीचे निधन झाले नाही, तर एका विचारपर्वाचा अस्त झाला.

'लातूर पॅटर्न' या शैक्षणिक क्रांतीचे जनक, अभ्यासू तत्त्वज्ञ, परखड पुरोगामी विचारवंत, परिवर्तनवादी लेखक आणि स्वच्छ राजकारणाचा आदर्श घालून देणारे व्यक्तिमत्त्व माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे सर आज आपल्यात नाहीत.

त्यांच्या जाण्याने केवळ लातूर नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या वैचारिक क्षितिजावर एक खोल पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या अस्तित्वाने जो प्रकाश दिला, तो केवळ संस्थांमध्ये नव्हे, तर हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात झिरपलेला आहे.

कवठ्याच्या मातीतून उगवलेला विचारांचा अंकुर...!

११ नोव्हेंबर १९३४. औसा तालुक्यातील 'कवठा' या छोट्याशा खेड्यात एका सामान्य कुटुंबात जन्म. साधे घर, मर्यादित साधनसामग्री; पण अफाट जिद्द आणि ज्ञानाची आस.

वडिलांनी मुलाच्या शिक्षणासाठी घेतलेली मेहनत ही त्यांच्या आयुष्याची पहिली प्रेरणा ठरली. लातूरमध्ये शालेय शिक्षण, उर्दू माध्यमातून मॅट्रिक आणि पुढे हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठात उच्च शिक्षण प्रत्येक टप्प्यावर त्यांनी स्वतःला सिद्ध केले.

१९५५ मध्ये अखिल भारतीय हिंदी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून त्यांनी तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद आणि पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडून कौतुकाची थाप मिळवली.

ही केवळ पारितोषिकाची गोष्ट नव्हती; ती त्यांच्या आत्मविश्वासाची पहिली सार्वजनिक दखल होती.

शिक्षणाला दिलेले ध्येयात्मक रूप

१९७० साली लातूर येथे स्थापन झालेल्या राजर्षी शाहू महाविद्यालय मध्ये पहिले प्राचार्य म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली. महाविद्यालय नवखे होते, साधने अपुरी होती; पण दृष्टी व्यापक होती.

त्यांनी विद्यार्थ्यांना 'गुण' नव्हे तर 'गुणवत्ता' शिकवली.

अभ्यासाचे तास वाढवले, चाचण्या नियमित केल्या, अभ्यासक्रमाची काटेकोर आखणी केली.

पालक-शिक्षक संवाद वाढवला.

या शिस्तबद्ध आणि परिणामकारक अध्यापन पद्धतीतूनच 'लातूर पॅटर्न'चा जन्म झाला.

आज हा शब्द केवळ एक पद्धत नाही; तो शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धात्मक तयारी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे प्रतीक आहे.

तब्बल २५ वर्षांच्या प्राचार्य पदाच्या कार्यकाळात त्यांनी घडवलेले हजारो विद्यार्थी आज देश-विदेशात उच्च पदांवर कार्यरत आहेत.

त्यांच्या यशात डॉ. वाघमारे यांचे संस्कार आणि मार्गदर्शन अढळपणे उभे आहे.या लातूर पॅटर्नचा धवल पताका मोठ्या डौलाने आज फडकत आहे.यातूनच लातूरचा सर्वांगीण विकास होत गेला याचे खरे श्रेय डॉ.वाघमारे सरांना द्यावा लागेल.

साहित्य, समाज आणि समतेचा विचार...

डॉ. वाघमारे सर यांचे व्यक्तिमत्त्व केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते. ते एक सखोल अभ्यासक आणि प्रगल्भ लेखक होते.

'अमेरिकन निग्रो : साहित्य आणि संस्कृती' या ग्रंथाने त्यांनी समाजातील वंचित घटकांच्या वेदनेला जागतिक संदर्भ दिला.

राजकारण, समाजकारण, साहित्य चिंतन, आत्मकथा अशा विविध विषयांवर त्यांनी तब्बल ७६ ग्रंथ लिहिले. त्यांच्या लेखनात विचारांची खोली, भाषेची नेमकी धार आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव दिसते.

त्यांच्या साहित्यावर अनेक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. आणि एम.फिल. केले हे त्यांच्या वैचारिक सामर्थ्याचे जिवंत प्रमाण आहे.

कुलगुरूपद ते नगराध्यक्ष ते खासदार पद- कार्याचा विस्तार...

१९९४ साली स्थापन झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ चे संस्थापक कुलगुरू म्हणून त्यांनी पायाभूत रचना उभारली.

विद्यापीठ हे केवळ पदवी देणारे केंद्र नसून विचारांची प्रयोगशाळा असावी, हा त्यांचा आग्रह होता.या विद्यापीठाची जागा निश्चिती पासुन ते येथील बांधकाम अगदी प्रत्येक बाबतीत सरांचे योगदान निश्चितच अविस्मरणीय अशा स्वरूपाचे राहीले. एवढ्यावरच न थांबता विद्यापीठ कार्यक्षेत्रात सरांनी कॉपी मुक्त परिक्षा अभियान राबविले यातून खऱ्या अर्थाने दर्जेदार विद्यार्थी घडले हे महत्वाचे योगदान कमालीचे चर्चेचे राहीले आज पर्यंत विद्यापीठात हा कॉपी मूक्तीचा पॅटर्न टिकून आहे.

२००१ मध्ये ते लातूरचे लोकनियुक्त नगराध्यक्ष झाले...

प्रशासनात पारदर्शकता, भ्रष्टाचारमुक्त कारभार आणि विकासाचे नियोजन या तत्त्वांवर त्यांनी ठामपणे काम केले.

त्यांच्या कार्यकाळात लातूर नगरपालिकेला राज्यस्तरीय स्वच्छता पुरस्कार मिळाला.

ते राजकारणात होते, पण सत्तेसाठी नव्हे; तर तत्त्वांसाठी. नगर परिषद निवडणूकीत नगराध्यक्ष पदाचे थेट जनतेचे उमेदवार म्हणून डॉ.जे.एम.वाघमारे सर तत्कालीन मुख्यमंत्र्याच्या पॅनल विरोधात निवडणूक येवून इतिहास घडविला होता.तेंव्हा ही बाब सबंध राज्यात चर्चेली गेली होती.

राष्ट्रीय व्यासपीठावर लातूरचा आवाज..

२००८ ते २०१४ या कालावधीत राज्यसभेचे सदस्य खासदार म्हणून त्यांनी राष्ट्रीय पातळीवरही काम केले.

संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी शांततेवर प्रभावी भाषण केले आणि सभागृहाचे लक्ष वेधून घेतले.

दिल्लीमध्ये सुरुवातीला शासकीय निवासस्थान न मिळाल्याने त्यांनी महाराष्ट्र सदनात राहून काम सुरू ठेवले.

ही साधेपणाची आणि चिकाटीची साक्ष आहे.

व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये...!

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण समतोल होता

विचारांची गहनता आणि आचरणातील साधेपणा.अत्यंत पुरोगामी विचारवंत म्हणून त्यांचे नांव अग्रभागी होते.

कठोर शिस्त आणि मायेची ऊब.

तत्त्वनिष्ठता आणि व्यवहारज्ञान.

ते विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक होते.

ते लेखकांचे प्रेरणास्थान होते.

ते समाजपरिवर्तनाच्या चळवळीतील विचारदीप होते.

सरांचा आणि माझा संपर्क तसा मी महाविद्यालयाचा विद्यार्थी होतो तेंव्हाच आला.ते विद्यापीठाचे कुलगुरू असताना आमच्या महात्मा गांधी महाविद्यालयात अनेकदा कार्यक्रमाच्या निमित्ताने येवून गेले.

मी साहित्य संगीत कला अकादमीचे स्थापना केलेली होती या अकादमीचे विविध पुरस्कार प्रत्येक वर्षी वितरित केले जायचे चित्रपट दिग्दर्शक डॉक्टर जब्बार पटेल सर यांना आघाडीचा सेवा गौरव पुरस्कार अहमदपूर येथे देण्याचे ठरले होते ऐनवेळी आमचे मुख्य अतिथी हृदयविकाराचा झटका आल्यामुळे येऊ शकत नव्हते त्यामुळे आमचे मोठे अडचण झाली होती अशा परिस्थितीत संध्याकाळी कार्यक्रम असताना सकाळी मी सरांना फोनवरून कार्यक्रमास येण्याची विनंती केली सुरुवातीला सरांनी कार्यक्रमास येण्यास थोडीशी असमर्थता दाखवली मात्र नंतर आमचे मोठे बंधू विद्यमान आमदार संजय भाऊ बनसोडे साहेब यांच्या शिष्टाईने ते अहमदपूर येथे आयत्यावेळेस आले. अहमदपूर येथे साहित्य संगीत कलाकादमीचा दर्जेदार कार्यक्रम त्यांनी पाहिला.त्यांनी आम्हा सर्व विद्यार्थ्यांचे व अकादमीच्या पदाधिकार्यांची पाठ थोपटली होती.येथून आमचे ऋणानुबंध अधिक वाढत गेले. नंतरच्या काळात पत्रकार म्हणून मी काम करत असताना सरांच्संया सतत संपर्कात होतो.पुढे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये ते कार्यरत असताना पक्षाचा पदाधिकारी म्हणून सुद्धा सरांच्या संपर्कात होतो.गेल्या अनेक वर्षापासून आमच्या साप्ताहिक सम्यक समताचा दिवाळी विशेषांक काढल्यानंतर अगदी आग्रहपूर्वक हक्काने सरांच्या घरी जाऊन विशेषांक द्यायचा. या अंकाबाबत मग सरांसोबत पुस्तकावर चर्चा करायची. प्रत्येक दोन तीन महिन्यांमध्ये आठवणीने सरांच्या घरी जाऊन १५ मिनिट अर्धा तास चर्चा करायचो.सर सुद्धा तेवढाच प्रेमाणे प्रतिसाद देत.वेळात वेळ काढून आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन करायचे.मात्र आता या सर्व आठवणीच राहील्या आहेत असेच म्हणावे लागेल.

अखेरचा निरोप पण विचार अमर..!

आज लातूरच्या मातीत एक वेदनादायी शांतता आहे.

राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रांगणात आठवणी दाटल्या आहेत.या महाविद्यालयात शिकलेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत.

परंतु एक सत्य नाकारता येणार नाही

विचार कधी मरत नाहीत.

डॉ. जनार्दन वाघमारे यांचा देह गेला असेल;

पण त्यांचे विचार, त्यांची मूल्यनिष्ठ परंपरा, त्यांचे लेखन आणि त्यांची शैक्षणिक क्रांती

ही सदैव जिवंत राहील.

त्यांनी दाखवलेला मार्ग पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल.

त्यांची स्मृती ही प्रेरणास्त्रोत ठरेल.

लातूर पॅटर्नचा विचारसूर्य आज अस्ताला गेला, पण त्याच्या किरणांची उब पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल एवढे मात्र निश्चित

भावपूर्ण विनम्र अभिवादन..!

**- डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी**
**माजी नगरसेवक / गटनेता**
**अहमदपूर, जि. लातूर**
**मो. ८१८००१३५११**

# डॉ. जे. एम. वाघमारे यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या वैचारिक आणि शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी - आमदार अमित देशमुख

**लातूर/प्रतिनिधी :** माजी खासदार, माजी कुलगुरू, लातूरचे माजी नगराध्यक्ष आणि थोर विचारवंत आदरणीय डॉ. जे. एम. वाघमारे सर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या जाण्यामुळे सामाजिक, शैक्षणिक, साहित्य आणि कला क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे, अशा शब्दांत माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आपली शोकसंवेदना व्यक्त केली आहे.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी डॉ. वाघमारे सरांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, माजी खासदार, माजी कुलगुरू, लातूरचे माजी नगराध्यक्ष, थोर विचारवंत आदरणीय डॉ. जे.एम. वाघमारे सर यांचे निधन झाल्याचे वृत्त अत्यंत दुःखद आहे, त्यांच्या जाण्यामुळे सामाजिक शैक्षणिक, साहित्य, कला व इतर सर्वच क्षेत्रात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून सरांनी प्रदीर्घ काळ सेवा बजावली. त्यांच्याच कार्यकाळात लातूरचा आदर्श शैक्षणिक पॅटर्न आकाराला आला, ज्यामुळे त्यांना या पॅटर्नचे जनक मानले जाते. ''शिक्षण केवळ चार भिंतींच्या आत मर्यादित नसते,'' या धारणेतून त्यांनी व्याख्याने आणि प्रबोधनाच्या माध्यमातून अनेक प्रगल्भ पिढ्या घडवल्या.

सामाजिक, शैक्षणिक कार्याच्या निमित्ताने तात्कालीन मुख्यमंत्री आदरणीय शरदचंद्र पवार साहेब आदरणीय विलासराव देशमुख साहेब व इतर क्षेत्रातील मान्यवर मंडळी सोबत त्यांचे अत्यंत स्नेहाचे संबंध होते, शिक्षण क्षेत्रातील त्यांचे उत्तुंग कार्य लक्षात घेऊन नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून त्यांची निवड झाली, या विद्यापीठाला सर्वदृष्टीने आकार देण्याचे कार्य डॉ.जे.एम. वाघमारे सर यांनी केले यातून, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आला आहे.

भारतीय संसदेचे सर्वोच्च सभागृह असलेल्या राज्यसभेचे खासदार म्हणूनही त्यांनी कार्य केले, त्या ठिकाणीही त्यांनी आपल्या वैचारिक भूमिकेतून वेगळा ठसा निर्माण केलेला आहे, लातूरचे नगराध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्यही दीर्घकालीन लक्षात राहील असे त्यांनी म्हटले आहे.

आदरणीय डॉ.जे.एम. वाघमारे सर आज आपल्यातून निघून गेले असले तरी, त्यांचे कार्य आणि विचार कायम स्मरणीय आणि प्रेरणादायी राहणार आहेत, अशा शब्दात डॉ. जे.एम.वाघमारे यांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी आदराजली अर्पन करुन आपण वाघमारे परीवाराच्या दुःखात सहभागी असून परीवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो अशी ईश्वरचरणी प्रार्थना त्यांनी केली आहे.

# मराठवाड्याचा शैक्षणिक चेहरा डॉ. जनार्दन वाघमारे सर

''मराठवाड्यासारख्या भागाला मागास भाग म्हणून हिणवले जात होते. नैसर्गिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या, राजकीयदृष्ट्या, मागासलेला भाग अशी मराठवाड्याची १९८० च्या दशकात पर्यंत ओळख होती. अशा मागास म्हणून हिणवल्या गेलेल्या मराठवाड्यात ''छत्रपती शिक्षण संस्थेच्या'' माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या राजर्षी शाहू महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. जे. एम. वाघमारे सरांच्या नेतृत्वाखाली अशी '' शैक्षणिक गरुड झेप ''घेतली अशी '' शैक्षणिक क्रांती'' केली की पाहता पाहता लातूर ही '' ''शिक्षणाची पंढरी'' म्हणून नावारूपाला आले .लातूर हा ''शैक्षणिक पॅटर्न ''बनला. लातूर शिक्षणाचे हब बनले. सर्वच अर्थाने मागासलेपणाचा शिक्का लागलेल्या मराठवाड्यात, पाण्याचं दुर्भिक्ष असलेल्या लातूर परिसरात डॉ. गोपाळराव पाटील यांच्या कल्पकतेतून डॉ. जनार्दन वाघमारे सर यांच्या नेतृत्वातून राजर्षी शाहू महाविद्यालय सुरू करण्यात आले. अगदी सुरुवातीला दगडी भिंतीच्या गोडाऊनमध्ये हे महाविद्यालय होते. कालांतराने शिक्षणप्रेमी संस्थाचालक , कल्पक नियोजन, काहीतरी नवीन करण्याची जिद्द, व प्राचार्याच्या रूपाने डॉ. जे .एम .वाघमारे सरांच्या रूपाने मिळालेले खंबीर नेतृत्व याच्या जोरावर राजर्षी शाहू महाविद्यालयाने अल्पावधीतच आपली गुणवत्ता सिद्ध केली. हजारो डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, प्राध्यापक, खेळाडू, कलावंत, प्रशासक ,निर्माण करणारी फॅक्टरी म्हणून या महाविद्यालयाचा नावलौकिक झाला. या महाविद्याच्या यशात फाउंडर प्राचार्य म्हणून डॉ. जे. एम. वाघमारे सरांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान होते .त्यांना त्या काळातील उपप्राचार्य डॉ. अनिरुद्ध जाधव सर डॉ. रावसाहेब कावळे सर व सहकार्यानी मदत केली. म्हणून पाहता पाहता राजर्षी शाहू महाविद्यालयाचा नावलौकिक संपूर्ण राज्यांमध्ये नव्हे तर देशात झाला. अगदी १९८० ते २०१० पर्यंत राज्याच्या कानाकोपऱ्यातून डॉक्टर होण्यासाठी इंजिनिअर होण्यासाठी हजारो विद्यार्थी लातूरच्या ''शिक्षण पंढरीमध्ये'' दाखल होत होते .तज्ञ शिक्षकवृंद ,कल्पक संस्थाचालक, व्हिजन असलेले प्राचार्य, सेवा समर्पण व संयमी वृत्तीचे शिक्षकेतर कर्मचारी, उत्तम नियोजन, तज्ञ व्यवस्थापन, व गुणवंत शिक्षकांच्या मदतीने शिक्षणात अहोरात्र गाढून घेतलेले असंख्य विद्यार्थी, अशी कर्मयोगाची परंपरा डॉ. जे .एम.वाघमारे सरांनी निर्माण केल्यामुळे मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण राज्य आणि देशांमध्ये लातूर पॅटर्नची आगळीवेगळी ओळख निर्माण झाली. संपूर्ण राज्यात व देशात ( )चा बाउ केला जात असताना त्यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयाला ''++'' दर्जा प्राप्त करून दिला. एकूणच काय तर गुणवत्तेचा ध्यास, गुणवत्तेची आस, गुणवत्तेची कास, व गुणवत्तेचा विकास या चतुसूत्रीच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रामध्ये लातूर पॅटर्न ही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.याला साथ संगत करताना शेजारच्या दयानंद महाविद्यालयाने व महात्मा बसवेश्वर महाविद्यालयांमध्येही गुणवत्तापूर्ण बदल झाले .त्यातून लातूर पॅटर्नच्या यशात ''चार चांद '' लागले. कित्येक वर्ष शाहू व दयानंद महाविद्याचे असंख्य विद्यार्थी गुणांनुक्रमे विज्ञान व वाणिज्य शाखेमध्ये स्वतःचा धबधबा निर्माण करून होते. सोबत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाने कला शाखेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पाहता पाहता हे गुणवत्तेचे लोन इतर शाळा महाविद्यालयात व शिकवणी वर्गापर्यंत पोहोचले, त्यातून लातूर चा शिक्षण क्षेत्रात दबदबा निर्माण झाला. आज देशाच्या कानाकोपऱ्यात लातूरचे विद्यार्थी स्वतःचे गुणवत्तापूर्ण , मेहनत करणारे, अभ्यासू, व कामातून स्वतःच वेगळं अस्तित्व निर्माण करणारे कर्मचारी म्हणून ओळख निर्माण करत आहेत. विनोद नव्हे तर ही वास्तविकता आहे, की एखादा कर्मचारी हुशार असेल, प्रामाणिक असेल, समर्पित असेल, इमाने इतबारे काम करत असेल.. तर'' तुम्ही लातूरचे आहात का..?'' म्हणून विचारले जाते,याचे सारे ''श्रेय लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नचे जनक डॉ. जे.एम. वाघमारे सरांना तसेच शाहू कॉलेजला, दयानंद कॉलेजला,व बसवेश्वर कॉलेजला व शहरातील इतर गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्थांना, शाळा महाविद्यालयाला जाते. म्हणून डॉ. जे .एम.वाघमारे सर मराठवाड्याचा शैक्षणिक चेहरा म्हणून महाराष्ट्राच्या शिक्षण पटलावर नावारूपाला आले. मराठवाड्याच्या शिक्षणाचा चेहरा डॉ. जे.एम. वाघमारे सर हा शब्दप्रयोग मी जाणीवपूर्वक करत आहे, कारण चेहरा व मुखवटा यात मूलभूत फरक असतो. चेहरा नैसर्गिक असतो. तर मुखवटा हा कृत्रिम असतो. चेहरा व मुखवटा यात अर्थ, स्वरूप ,प्रतिकात्मकता, आशयात्मकता या सर्व अंगाने फरक असतो. म्हणजे चेहरा नैसर्गिक असतो, तर मुखवटा कृत्रिम असतो. मुखवटा धारण करावा लागतो, मुखवटा स्वीकारावा लागतो. चेहरा जन्मजात असतो ,तर मुखवटा बाहेरून चिटकवलेला असतो. चेहरा खरी ओळख दर्शवतो, तर मुखवटा खरी ओळख लपवतो, चेहऱ्यावर भाव भावना संवेदना खऱ्या असतात. चेहरा माणसाची खरी ओळख असतो, तर मुखवटा माणसाची बनावट ओळख असते. चेहरा उघडा करता येतो पण वास्तवता आहे तीच राहते. मुखवटा उघडा केला तर वास्तवता संपूर्ण बदलून जाते. चेहरा सत्याशी जवळीक सांगतो, तर मुखवटा आभासी असतो. या चेहरा व मुखवट्या मागील मूलभूत फरकावरून मला हेच सांगायचे आहे की डॉ. जे.एम. वाघमारे सर हे मराठवाड्यातील शिक्षणाचा खरा चेहरा होते. कारण त्यांनी केवळ शिक्षण क्षेत्रात शिस्त निर्माण केली नाही. केवळ गुणवत्तापूर्ण विकास केला नाही, तर वास्तविक जीवनातही त्यांनी त्यांच्या गुणात्मक चेहऱ्याच्या जोरावर, साहित्य ,कला ,राजकारण, समाजकारण ,सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून नवनवीन आदर्श निर्माण केले. नव्या जाणीव निर्माण केल्या. नवीन मूल्य रुजवले. म्हणून तर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून आगळी वेगळी ओळख निर्माण केली. १९९४ मध्ये निर्माण झालेल्या या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून विद्यापीठाला त्यांनी सुंदर अशी इमारत दिली. प्रशासकीय पारदर्शकता दिली. प्रशासकीय गतिमानाचा प्रस्थापित केली. विविध संकुलाची उभारणी केली. गुणवत्तेचा ध्यास घेतला. ग्रामीण विद्यार्थ्यांना, बहुजनांना, वंचितांना, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून दिले. शिक्षण हे सामाजिक न्यायाचे साधन मानले. आचार ,विचार ,उच्चार व कृतीतून लोकशाही मूल्यांचे जतन आणि संवर्धन केले. १९९४ ते १९९९ पर्यंत विद्यापीठाला परिपूर्ण बनवण्यासाठी त्यांनी कार्य केले. सोबतच त्यांचे साहित्यिक योगदान त्यांच्या विचाराची उंची दर्शवते. त्यांची प्रतिभा व प्रगल्भता त्यांच्या साहित्यातून डोकावते. ''अमेरिकन निग्रो -साहित्य व संस्कृती'' '' महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण'' '' हाक आणि आक्रोश'' '' शिक्षण- समाज परिवर्तन व राष्ट्रविकास'' '' चिंतन एका कुलगुरूचे'' '' आजचे शिक्षण स्वप्न व वास्तव'' '' मुठभर माती आत्मकथा '' इत्यादी पुस्तकाच्या माध्यमातून ग्रंथ व आत्मचरित्राच्या माध्यमातून डॉ. जे.एम .वाघमारे सरांनी कायमच समाज प्रबोधनाचा व समाज परिवर्तनाचा विचार लोकांसमोर मांडला. या सोबतच शेकडो व्याख्याने व राज्यसभेचा खासदार म्हणून भारताच्या संसदेत त्यांनी केलेले कार्य अत्यंत समाज उपयोगी आणि राष्ट्र उभारणीचे होते. म्हणून या सर्व पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील लोकांमध्ये असणाऱ्या गुणवत्तेचा ,बुद्धिमत्तेचा, कल्पकतेचा, विद्वत्तेचा, प्रज्ञावंताचा, प्रशासकाचा ,राज्य व देशाच्या पटलावर व्यक्त होणारा खरा चेहरा जनमानसासमोर आणण्याच्या भावनेतून नम्रपणे एकच भाव मनामध्ये उमटला तो म्हणजे '' मराठवाड्याच्या शिक्षणाचा चेहरा डॉ. जे. एम .वाघमारे सर होय..!!

**-----प्रा .डॉ. शशिकांत तोळमारे**
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय
वसमत जिल्हा हिंगोली. ९४२१०८८२६२

# मधुमेहाची रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी




मधुमेही रुग्णांनी रक्तातील साखर (डींसरी) नियंत्रित ठेवण्यासाठी पालेभाज्या, कडधान्ये आणि फायबरयुक्त आहार घ्यावा. दररोज व्यायाम, पुरेसे पाणी, वेळेवर औषधे आणि नियमित साखर तपासणी गरजेची आहे। साखर, गोड पदार्थ, मैदा आणि प्रक्रिया केलेले अन्न टाळा। ताणमुक्त राहणे आणि पुरेशी झोप घेणे साखरेच्या व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे।

मधुमेही रुग्णांसाठी महत्त्वाच्या आरोग्य टिप्स-आहार: आहारात पालेभाज्या, संपूर्ण धान्य, लीन प्रोटीन आणि फळांचा समावेश करा। फायबरयुक्त अन्नामुळे साखरेची पातळी लवकर वाढत नाही.

काय टाळावे: साखर, गोड पेये, मैद्याचे पदार्थ, तळलेले अन्न आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळा।हायड्रेशन (कूव्रीर-ींळेप): दिवसभरात पुरेशा प्रमाणात पाणी प्या, यामुळे रक्तातील ग्लुकोज पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते.नियमित व्यायाम: रोज ३०-४५ मिनिटे चालणे, योगा किंवा कोणताही व्यायाम करा. वेळेवर औषधे: डॉक्टरांनी दिलेली औषधे किंवा इन्सुलिनची वेळ कधीही चुकू देऊ नका. साखर तपासणी (चेपळीेळपस): घरच्या घरी ग्लुकोमीटरने रक्तातील साखरेची पातळी नियमित तपासा (उपाशीपोटी आणि जेवणानंतर). जखम/संक्रमण: साखरेच्या रुग्णांनी शरीरावर झालेल्या जखमांकडे लक्ष द्यावे, कारण त्या लवकर बऱ्या होत नाहीत। लक्षणे ओळखा: वारंवार तहान लागणे, लघवी होणे, थकवा किंवा वजन कमी होणे ही उच्च साखरेची लक्षणे आहेत, अशी लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या।

# धूलिवंदन





















होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदन हा सण साजरा केला जातो. या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना अंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने अंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कैऱ्याही मिळू लागतात. कैऱ्या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात. अंगाला फासतात व नंतर स्नान करतात. काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्साहाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे. धूलिवंदन हा सण होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. यास धुळवड असेही म्हटले जाते. या दिवशी महाराष्ट्रात सार्वजनिक सुट्टी असते. हा सण फाल्गुन कृष्ण प्रतिपदेला साजरा करतात. परंपरेप्रमाणे या दिवशी होलीका दहनाची राख एकमेकांना लावतात.

कोकणात प्रत्येक गावाचे धूलिवंदन वेगवेगळ्या दिवशी असू शकते. या गावाचे धूलिवंदन सामान्यतः होळीच्या १५व्या दिवशी असते.

फाल्गुन हा शालिवाहन शक महिन्यातील शेवटचा महिना आहे. त्यामुळे होळी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार येणाऱ्या महिन्यातील शेवटचा सण असतो. होळी पेटवून दुसऱ्या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी जमिनीला, मातीला नमस्कार करण्याची प्रथा आहे. प्रत्येक प्राणी मात्राचा देह हा पंचमहाभूतांपासून बनलेला असतो. पृथ्वी, आप, त्वज, वायू, आकाश असा या पंचमहाभूतांचा क्रम आहे. पृथ्वी पासून सुरुवात आणि आकाशापर्यंत शेवट असे पंचक असणाऱ्या या तत्वांना आपल्या सणांच्या मधून आदर व्यक्त करण्याचा एक दिवस म्हणजे धूलिवंदन. यादिवशी पृथ्वीला वंदन केले जाते. त्यानंतर १५ दिवसांनी नववर्षाची म्हणजे पाडव्याच्या दिवशी आकाशाला भिडणारी गुढी उभारण्याची पद्धत आहे.या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना अंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने अंघोळ केली असता लहान

# योग ही शारीरिक, मानसिक स्वास्थ्यासाठी




योग ही शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्यासाठी प्राचीन भारतीय जीवनशैली आहे, जी शरीर व मनाचे संतुलन राखते. 'युज' या संस्कृत शब्दापासून बनलेला योग (अर्थ: जोडणे/एकत्रित होणे) श्वासोच्छवास (प्राणायाम), आसन (धेसर झीशी) आणि ध्यान यांद्वारे निरोगी आयुष्य प्रदान करतो २, ६. ऋषी पतंजली यांना आधुनिक योगाचे जनक मानले जाते ५.

योगाचे महत्त्व आणि फायदे (खॉीरिपलश ेष धेसर)

शारीरिक आरोग्य: योगासने शरीराची लवचिकता, ताकद आणि संतुलन वाढवतात ६.मानसिक शांती: नियमित योगाभ्यासामुळे ताण-तणाव, नैराश्य कमी होऊन मन एकाग्र व शांत राहते १०.

आजार मुक्ती: मधुमेह, रक्तदाब आणि पाठीचे विकार दूर ठेवण्यास योग मदत करतो ११.जीवनशैलीत सुधारणा: योगामुळे शिस्त व सकारात्मकता येते १. योगाचे प्रमुख प्रकार-भारतीय योगशास्त्रात पाच प्रमुख प्रकार सांगितले आहेत ४:ज्ञानयोग: आत्मज्ञान आणि ज्ञानाचा मार्ग.हठयोग: शारीरिक आसन आणि शुद्धीकरण क्रिया.कर्मयोग: फळाची अपेक्षा न करता कर्तव्य करणे.भक्तियोग: ईश्वरभक्ती आणि समर्पण.राजयोग: मन आणि विचारांवर नियंत्रण (अष्टांग योग). अष्टांग योग (एळसहीं डळाली ेष धेसर)महर्षी पतंजलींनी योगाची आठ अंगे सांगितली आहेत १४: १. यम, २. नियम, ३. आसन, ४. प्राणायाम, ५. प्रत्याहार, ६. धारणा, ७. ध्यान, ८. समाधी. काही महत्त्वाची योगासने (खॉीरिपीं धेसर झीशी)सूर्यनमस्कार: १२ आसनांचे हे मिश्रण संपूर्ण शरीरासाठी फायदेशीर आहे.ताडासन: उंची वाढवण्यासाठी आणि शरीराचा समतोल राखण्यासाठी.

# आरोग्य: घ्या डोळ्यांची काळजी





धूळवड खेळताना जर रंग डोळ्यांत गेला, तर पटकन करा या ४ गोष्टी

धूळवड खेळायला मज्जा जरी येत असली तरी ती सांभाळून खेळण्याचा इशारा तज्ज्ञ देतात. कारण एकदा का रंग डोळ्यांत गेला तर ती एक समस्याप्रधान परिस्थिती असू शकते. मात्र अशावेळी काही प्रभावी उपचार माहीत असेल तर त्यापासून त्वरित आराम मिळवता येऊ शकतो. तर, रंग अचानक डोळ्यात गेला तर त्वरित या ३ गोष्टी करा. जेणेकरून तुम्ही तुमचे डोळे वाचवू शकता.

केश्रळ एूश उरीश ढळींi

डोळ्यात गेलेला रंग काढण्यासाठी तात्काळ करा या ४ गोष्टी

केश्रळ एूश उरीश ढळीं: धूलिवंदनाचा सण अवघ्या काही दिवसांवर येणार आहे. या वर्षी होळी (केश्रळ २०२५) दिनांक १३ मार्चला असून, होलिका दहनानंतर दिनांक १४ मार्च रोजी धूळवड खेळली जाईल. या दिवशी सर्वजण गुलाल एकेमएकांच्या चेहऱ्याला लावतात, हवेत उधळवतात. अशावेळी होळीचे रंग अचानक डोळ्यात जाऊ शकतात. मग अशावेळी डोळ्यातील रंग काढण्यासाठी लोकं डोळे चोळू लागतात, पण असे अजिबात करू नका. कारण यामुळे डोळ्यांना आणखीन इजा होऊ शकते.

होळी हा रंगांचा सण आहे. या सणात, भारताचा प्रत्येक रस्ता आणि कोपरा रंगांनी भरलेला असतो. लोक एकमेकांना रंग लावतात आणि एकमेकांना सणाच्या शुभेच्छा देतात. या रंगांमध्ये अनेक प्रकारची हानिकारक रसायने असतात, ज्यामुळे त्वचा, डोळे आणि केसांना संसर्ग आणि नुकसान होऊ शकते. पण कधीकधी, आनंद आणि रंगांनी भरलेला हा सण काही घटनेमुळे बेरंग होऊ शकतो. जसे की जर रंग एखाद्याच्या डोळ्यात गेला तर त्याचे वाईट परिणाम संबंधित व्यक्तीला भोगावे लागतात. मग अशा परिस्थितीत काय करावे? तुमच्या डोळ्यात रंग गेल्यास लगेच काय करायला हवे? हे आज या लेखाच्या माध्यमातून जाणून घ्या.

धूळवड खेळायला मज्जा जरी येत असली तरी ती सांभाळून खेळण्याचा इशारा तज्ज्ञ देतात. कारण एकदा का रंग डोळ्यांत गेला तर ती एक समस्याप्रधान परिस्थिती असू शकते. मात्र अशावेळी काही प्रभावी उपचार माहीत असेल तर त्यापासून त्वरित आराम मिळवता येऊ शकतो. तर, रंग अचानक डोळ्यात गेला तर त्वरित या ३ गोष्टी करा. जेणेकरून तुम्ही तुमचे डोळे वाचवू शकता.डोळे उघड झाक कराडोळ्यात गेलेला रंग बाहेर काढण्यासाठी सर्वात आधी डोळे उघड झाक करत रहा. जेणेकरून डोळ्यांच्या कड्याना

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



कुठल्याही व्यक्तीचे वय जसे जसे वाढते तसे तसे त्याच्या शरीरातील अंगांचे देखील काम करण्याची शक्ती कमी होत जाते. सेक्स संबंध बनवण्यासाठी देखील ही गोष्ट लागू होते. जर कोणी व्यक्ती म्हातारपणी तरुणीशी लग्न करण्याबाबत विचार करतो की मी संभोग शक्ती वाढवणार्या गोळ्या खाऊन आपल्या बायकोसोबत सेक्स केले तर ती संतुष्ट होईल. पण त्याचे असे विचार करणे चुकीचे आहे. संभोग शक्तीचे वाढणे किंवा कमी होणे प्रकृतीवर निर्भर असत. म्हातारपणी जर एकवेळा संभोग करण्याची शक्ती गेली तर दुसर्यांदा कुठल्याही पद्धतीने ती परत मिळणे शक्य नाही आहे.


## २ Joke विनोद




ऑपरेशन

एक माणसाचे ऑपरेशन होणार असते. डॉक्टर येतात. तो माणूस आपले खिसे चाचपून पाहात असतो. त्यावर डॉक्टर म्हणतात, 'अहा, पैसे आधी द्यायलाच पाहिजेत असे नाही' तेव्हा हसून तो म्हणतो, 'नाही हो. पैसे फक्त मोजून ठेवतोय. तुम्ही मला आता गुंगीचे औषध देणार आहात ना!

## ३ Message संदेश



Teacher: duniya ke sabse puraana praani kaunsi hai?
Student: zebra hai sir
Teacher: kaise:
Student: kyunki, woh black and white hai na

## ४ Thought सुविचार




एखाद्या सच्च्या वैज्ञानिकाला जर त्याच्या विज्ञानाविषयी एखादा अत्यंत गहन प्रश्न विचारला तर तो वैज्ञानिक नि:शब्द होईल, आणि एखाद्या सच्च्या धार्मिक मनुष्याला जर त्याच्या धर्माविषयी एखादा अत्यंत साधा प्रश्न विचारला तर तो धार्मिक मनुष्य कृद्ध होईल. **– केदार जोशी**

### संस्कृत सुभाषित

**हा माझा अन् तो दुसऱ्याचा वाटे क्षुद्र मनुष्याला।**
**सारी पृथ्वी असे एक घर वाटे विशाल हृदयीला।।**

अर्थ – हा माझा, तो दुसऱ्याचा अशी क्षुद्र मनाच्या माणसांची वृत्ती असते. याउलट मोठ्या मनाच्या लोकांना मात्र सर्व पृथ्वीच आपले कुटुंब वाटत असते. त्यांच्या ठिकाणी क्षुद्र भेदभाव नसतो. त्याचे हृदय विशाल, उदार असते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. दुसऱ्यावरती अवलंबून राहणे
५. रेशमी धोतर
७. जास्त वयाचा नवरदेव
१०. अस्वल
११. जाळ्यामध्ये प्राण्याला अडकवून शिकार करणारा
१५. परमेश्वर
१७. मुलाची मुलगी
१८. पृथ्वी
२०. धरणाचे पर्जन्यक्षेत्र
२३. बंदी, मज्जाव
२५. चप्पल
२६. खंदक, खोल व लांब खड्डा
२७. हत्ती
२९. वेळ (हिंदी)
३०. निराश
३२. पक्के आश्वासन
३४. परिस्थिती
३६. व्यायाम, सैन्याची परेड
३८. डोंगरावरचा सपाट बाग
४०. सबब, निमित्त
४२. दृष्टी, रोखलेली नजर
४३. आभाळ कोसळल्याची आवई उठवणारा इसापनीतीमधील प्राणी
४४. आपले राष्ट्रीय फूल
४६. बायको
४७. अत्यंत आवडता, प्रिय
४९. एकरूप
५१. कपोल
५२. गाजराचे पक्कान्न
५४. मुस्लिमांची धार्मिक शिक्षण देण्याची शाळा
५६. काकडी इ.चे कोशिंबीरीसारखे तोंडीलावणे
५८. पोळ्या भाजण्याचे साधन
५९. रानटी
६०. दुसऱ्यावर चटकन विश्वास ठेवणारा, भोळा
६१. कागद, कापड कापण्याचे साधन
६२. खास हकीकत
६५. जादूगाराची पिशवी
६७. तमाशातील शृंगारीक गीत
७०. झाडाभोवती बांधलेला कट्टा
७१. तेज, कांती
७३. राजदरबारातील सभासद
७४. कोर्टातील दावा
७६. आवाज, नाद
७७. नकला करणारा
८०. नायक (इंग्रजी)
८१. कडाक्याचे भांडण
८३. सतत नाही म्हणणे
८६. अत्यंत दुष्ट मनुष्य
८७. खोटे बोलणारा
८८. अत्यंत थोडे प्रमाण, अंगठा व तर्जनी यातील किमान अंतर

### उभे शब्द

१. कसोटी
२. ढीग
३. रावणाचे एक संबोधन
४. फायदा
५. कमी करणे
६. किंमत
८. एक छोटे चर्मवाद्य
९. तुरडाळीचे गरगट
१२. सेनापती
१३. धैर्य
१४. पादत्राण, खेचर
१९. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
२०. पाणी भरण्याची जागा
२१. डोळे
२२. लग्न इ. विविध करण्याची जागा
२३. माझे
२४. गणपतीचे एक नाव
२८. विष
२९. मनाला टोचणारे दु:ख
३१. रात्र
३३. उसाचा रस काढण्याचे साधन
३५. किराणा माल
३७. मार्गक्रमण
३८. नजर चुकवून हळूच पळालेला
३९. दरी
४१. एक अप्सरा
४३. एकाच काळातील
४५. सुसर
४६. गुणाकारच्या विरुद्ध
४८. दाद, प्रशंसोद्गार
५०. सपाट
५३. मंगलवाद्ये
५५. मांसाहार
५७. डग्याच्या जोडीचे वाद्य
६१. चकणी
६३. म्हैस
६४. अखेर, नाश
६५. लहान मुलांची संख्या जास्त असलेले घर
६६. अंकुर
६८. लग्गा
६९. सूर्यापासून प्राप्त
७०. तपासणे, परीक्षा घेणे
७२. अंतराळात प्रवास करणारे वाहन
७३. मंत्रीमंडळ
७४. अगदी सत्य
७५. किंचित लाल रंगाचा
७८. ज्वारीचे वाळलेले खुंट
७९. कर्ण
८२. गोष्ट, कहाणी
८४. छोटी घंटा
८५. जप्ती

### आडवे उत्तरे

१.परावलंबन ५.कद ७.घोडनवरा १०.रीस ११.फासेपारधी १५.ईश्वर १७.नात १८.रसा २०.पाणलोट २३.मना २५.वहाण २६.चर २७.गज २९.समय ३०.नाराज ३२.वचन ३४.हालहवाल ३६.कवायत ३८.पठार ४०.कारण ४२.टक ४३.ससा ४४.कमळ ४६.भार्या ४७.जिवाभावाचा ४९.समरस ५१.गाल ५२.हलवा ५४.मदरसा ५६.कायरस ५८.तवा ५९.जंगली ६०.सांब ६१.कात्री ६२.नवलविशेष ६५.पोतडी ६७.लावणी ७०.पार ७१.रया ७३.सरदार ७४.खटला ७६.रव ७७.नकलाकार ८०.हिरो ८१.खडाष्टक ८३.नकारघंटा ८६.खवीस ८७.थापेबाज ८८.टीचभर

### उभे उत्तरे

१.परीक्षा २.रास ३.लंकेश्वर ४.नफा ५.कपात ६.दर ८.डफ ९.वरण १२.सेनानायक १३.धीर १४.खेटर १९.सावज २०.पाणवठा २१.लोचन २२.मंगल कार्यालय २३.मम २४.विनायक २८.जहर २९.सल ३१.रात ३३.चरक ३५.वाणजिन्नस ३७.वाटचाल ३८.पसार ३९.घळ ४१.रंभा ४३.समकालीन ४५.मगर ४६.भागकार ४८.वाहवा ५०.समतल ५३.वाजंत्री ५५.सामिष ५७.रयत ५८.तबला ६१.काणी ६३.वगर ६४.शेवट ६५.पोरवडा ६६.डीर ६८.वशिला ६९.सौर ७०.पारखणे ७२.यान ७३.सरकार ७४.खरोखर ७५.लालसर ७८.कडबा ७९.कान ८२.कथा ८४.घंटी ८५.टाच




# टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये संजू सॅमसनची कामगिरी कौतुकास्पद : गंभीर



निर्णायक सामन्यात संजू सॅमसनने साकारलेल्या नाबाद ९७ धावांच्या खेळीमुळे भारतीय संघाने वेस्ट इंडिजचा पराभव करत ट्वेन्टीङ्क२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. संघाला जेव्हा सर्वाधिक गरज होती, त्यावेळी सॅमसनने आपली क्षमता सिद्ध केली, असे म्हणत भारतीय संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरने यष्टिरक्षकङ्क फलंदाजाचे कौतुक केले.

संजू हा जागतिक दर्जाचा खेळाडू आहे. त्याची गुणवत्ता वादातित आहे. त्याला फक्त पाठिंबा देण्याची गरज होती. संघाला जेव्हा त्याची सर्वाधिक आवश्यकता होती, तेव्हा त्याने आपली क्षमता दाखवली. त्याची कामगिरी खरोखरच कौतुकास्पद होती,असे गंभीर विंडीजविरुद्धच्या सामन्यानंतर म्हणाला.

ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या सामन्यात १९६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सॅमसन अखेरपर्यंत टिकून राहिला. त्याने पूर्णपणे नियंत्रण राखून फलंदाजी केली, असे गंभीरने नमूद केले. त्याने सर्व 'क्रिकेटिंग शॉट्स' मारले. चेंडूचा टप्पा पाहून त्यानुसारच सॅमसन फलंदाजी करत होता. तो चेंडूला जोरात मारताना दिसला नाही. त्याच्यातील नैसर्गिक प्रतिभा यावेळी ठळकपणे दिसून आली, असे गंभीर म्हणाला.

ट्वेन्टीङ्क२० विश्वचषक स्पर्धेपूर्वी झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत सॅमसनला अपेक्षित यश मिळाले नव्हते. त्यामुळे त्याला थोडी विश्रांती देणे आवश्यक होते, असेही गंभीर यांनी स्पष्ट केले. कधी कधी खेळाडूला दडपणातून बाहेर काढणे गरजेचे असते. आम्हाला खात्री होती की विश्वचषकात जेव्हा गरज भासेल, तेव्हा तो नक्कीच चमकेल, असे गंभीरने सांगितले.गंभीरने 'पॉवरङ्क प्ले'मधील गोलंदाजीचाही विशेष उल्लेख केला. पहिल्या सहा षटकांत भारतीय गोलंदाजांना बळी मिळवता आला नाही, पण त्यांनी विंडीजच्या सलामीच्या जोडीला केवळ ४५ धावा करू दिल्या. अशा मोठ्या सामन्यात नवीन चेंडूसह चांगली सुरुवात करणे महत्त्वाचे असते. अर्शदीप सिंग आणि हार्दिक पंड्या यांनी सुरुवातीची तीन षटके उत्कृष्ट टाकली. तसेच अक्षरने पॉवरङ्कप्लेमध्ये दोन षटके प्रभावीपणे पूर्ण केली. या खेळपट्टीवर ते सोपे नव्हते, असे गंभीर म्हणाला.



## थोडक्यात/ संक्षिप्त



### सॅमसन नाही तर टीम इंडियाच्या विजयाचा 'हिरो':शेय होप

**कोलकाता**–कोलकाताच्या एडन गार्डन स्टेडियमवर भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यात टी२० वर्ल्ड कप २०२६ मधील सुपर ८ चा सामना खेळवला गेला. यात टीम इंडियाला प्रथम फलंदाजी करून वेस्ट इंडिजने विजयासाठी १९६ धावांचं आव्हान दिलं होतं. हे आव्हान पूर्ण करण्यात टीम इंडिया यशस्वी ठरली. दरम्यान संघाचा सलामी फलंदाज संजू सॅमसनने भारताला एकहाती विजय मिळवून दिला ज्यात त्याने ९७ धावांची नाबाद खेळी केली. या विजयामुळे टीम इंडिया सेमी फायनलसाठी क्वालिफाय झालीये. संजू सॅमसनला टीम इंडियाच्या या विजयाचं शिल्पकार मानलं जातंय, परंतू वेस्ट इंडिजचा कर्णधार शेय होपने सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत भारत – वेस्ट इंडिज सामन्यातील खरा टर्निंग पॉईंट सांगितला. तसेच वेस्ट इंडिज संघाने नेमकी चूक कुठे केली हे सुद्धा सांगितलं.

### पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अजब फर्मान, सुमार काम गिरीसाठी खेळाडूंना करणार दंड

**ईस्लामबाद**–टी२० वर्ल्डकप स्पर्धेत ढिसाळ आणि सर्वसाधारण कामगिरी करणाऱ्या पाकिस्तान क्रिकेट संघातील खेळाडूंना दंडाला सामोरे जावे लागणार आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने यासंदर्भात निर्णय घेतला आहे. १५ सदस्यीय संघाला मिळून सुमारे १८,००० अमेरिकन डॉलर्स एवढा दंड ठोठावण्यात आला आहे. पाकिस्तान क्रिकेट संघाला सेमी फायनल फेरीत प्रवेश करता आला नाही. सुपर८ फेरीत त्यांचे आव्हान संपुष्टात आले. आयसीसीतर्फे आयोजित सलग चौथ्या स्पर्धेत पाकिस्तान संघाला सेमी फायनलचा टप्पा गाठता आलेला नाही. यामुळे संघातील खेळाडूंवर कारवाई करण्यात आली आहे.

शिस्तभंग किंवा वर्तनासाठी हा दंड नसून, स्पर्धेतील सुमार आणि ढिसाळ कामगिरीसाठी आहे असं बोर्डाने स्पष्ट केलं आहे. पारंपरिक प्रतिस्पर्धी भारताविरुद्ध खेळणार नाही असा पवित्रा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने घेतला होता.

### चेन्नई सुपर किंग्जच्या नव्या जर्सीचे अनावरण

पाच वेळा विजेत्या चेन्नई सुपर किंग्जने म्हणजेच सीएसकेने आयपीएल २०२६ च्या आधी त्यांची नवीन जर्सीचे अनावरण केले आहे. चेन्नईने शनिवारी (२८ फेब्रुवारी) सोशल मीडियावर एका पोस्ट करून खळबळ उडवून दिली होती. ज्यामध्ये रविवारी सकाळी ७:०७ वाजता भारतीय वेळेनुसार मोठी घोषणा करण्यात येणार असल्याचे नमूद केले होते.त्यानुसार सीएसकेने नंतर एक व्हिडिओ रिलीज करून चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला. या व्हिडिओमधून चेन्नईच्या टीमने आयपीएलच्या नवीन हंगामापूर्वी सीएसके कॅम्पमध्ये धोनीचे आगमन झाल्याची माहिती

# टी-२० वर्ल्डकपमधून बाहेर पडलेला हा संघ भारतात अडकला

ईराण इस्त्राईल यांच्यातील युद्धाच परिणाम आता वेस्ट आशियातील हवाई क्षेत्रावर झाला आहे. ज्यामुळे झिम्बाब्वेचा संघ भारतात अडकला आहे.

टी-२० विश्वचषक २०२६ च्या सेमीफायनलचे संघ ठरले. त्यामुळे सुपर-८ मधून ४ संघ बाहेर पडले आहेत. त्यापैकी आता ४ संघ स्पर्धेबाहेर झाले आहेत. पण त्यातील एक संघ मात्र अद्याप मायदेशी परतू शकलेला नाही. मध्य पूर्वेतील तणाव अधिक वाढत चालला आहे. अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारीला इराणवर मोठे क्षेपणास्त्र हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि अनेक उच्च सुरक्षा अधिकारी ठार झाले. त्यानंतर इराणने प्रत्युत्तर दिल्यानंतर हवाई क्षेत्रावर याचा परिणा झाला आहे.

मध्य पूर्वेत संध्या युद्ध पेटलं आहे आणि इराणने इस्रायल आणि आखाती प्रदेशातील अमेरिकेच्या तळांवर क्षेपणास्त्रे डागून प्रत्युत्तर दिलं आहे. याचा परिणाम आता भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकावर झाला आहे. हवाई क्षेत्र



### इराण-इस्त्रायल युद्धामुळे मायदेशी परतण्यास विलंब

बंद करण्यात आली असून विमान प्रवासला मोठा फटका बसला आहे. २०२६ च्या टी-२० विश्वचषकानंतर झिम्बाब्वेसमोर मोठे आव्हान आहे. स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर संघ भारतातून मायदेशी परतण्याची तयारी करत होता, परंतु पश्चिम आशियातील हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे त्यांचं माघारी जाणं लांबणीवर गेलं आहे. झिम्बाब्वेने रविवारी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शेवटचा सामना खेळला, जिथे त्यांना पराभव पत्करावा लागला. सुपर आठमधून बाहेर पडल्यानंतर त्यांची मोहीम संपली.

संजू सॅमसनने गुडघ्यावर बसून आभाळाकडे पाहत केलेल्या सेलिब्रेशनमागचं गुपित काय? सामन्यानंतर स्वत: केला खुलासा

बुमराहने सांगितला भारताच्या विजयाचा खरा टर्निंग पॉईंट, संजू नव्हे तर 'या' खेळाडूचे दोन चौकार ठरले निर्णायक

ङ्कदु:खी होऊ नकोस, ही स्पर्धाःङ्क, रोहित शर्मा संजूला वर्ल्डकपच्या सुरूवातीला मैदानावर जे बोलला तेच खरं ठरलं! तखऊएज एकदा पाहाच..

योजनेनुसार, संघ सोमवारी सकाळी दिल्लीहून हरारेला जाण्यासाठी बॅचमध्ये रवाना होणार होता, ते एमिरेट्स एअरलाइन्सच्या फ्लाइटने दुबईमार्गे पोहोचणार होते. काही सदस्यांना पहाटे ४:३० वाजता निघायचे होते, तर काही जण उशिरा निघणार होते.

पण, इराण-इस्रायल युद्धानंतर परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. दुबईसारख्या प्रमुख वाहतूक केंद्रांवर परिणाम झाला आहे. बहुतेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत किंवा त्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत, ज्यामुळे झिम्बाब्वे संघ परत जाऊ शकला नाही.

झिम्बाब्वे संघ सध्या दिल्लीत आहे. त्यांना ४ मार्चपर्यंत हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. परिस्थितीवर लक्ष ठेवून आयसीसीने आकस्मिक योजनेवर काम सुरू केलं आहे. स्पर्धेचे आयोजक युरोपियन, दक्षिण आशियाई किंवा आग्नेय आशियाई केंद्रांसारख्या इतर मार्गांचा आणि विमान कंपन्यांचा शोध घेत आहेत. आयसीसीने एक ट्रॅव्हल सपोर्ट डेस्क देखील सुरू केला आहे आणि रिअल-टाइम अपडेट्स मिळिवण्यासाठी सुरक्षा सल्लागारांसोबत

# तर उपांत्य फेरीचा सामना दुपारी सुरु होणार; आयसीसी चा नियम काय?

मुंबई–२०२६ चा टी-२० विश्वचषक आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. चार आठवड्यांच्या रोमांचक क्रिकेटनंतर, अंतिम चार संघ निश्चित झाले आहेत. गतविजेता भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंड हे ट्रॉफीच्या शर्यतीत आहेत. सर्व नॉकआउट सामने आता भारतात खेळवले जातील. पहिला उपांत्य सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात होईल. त्यानंतर भारत आणि इंग्लंड दुसऱ्या उपांत्य सामन्यात एकमेकांसमोर येतील. या दोन्ही सामन्यांमधील विजेते अंतिम फेरीत भेटतील.

सेमीफायनलसाठी आयसीसीचे विशेष नियम : दोन्ही उपांत्य सामन्यांसाठी राखीव दिवस निश्चित करण्यात आला आहे. हवामान लक्षात घेऊन आयसीसीनं हे नियम स्थापित केले आहेत. सामना नियोजित दिवशी पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, परंतु आवश्यक असल्यास षटक कमी केले जाऊ शकतात. राखीव दिवसाचा वापर कमीत कमी करण्यासाठी आयसीसीनं सामना पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त वेळ दिला आहे.

अतिरिक्त वेळ नियोजित दिवशी ९० मिनिटं आणि राखीव दिवशी १२० मिनिटं असेल. मात्र, निकालासाठी दोन्ही संघांना किमान १० षटकं फलंदाजी करावी लागेल.

जर सामना राखीव दिवशी हलवला गेला तर पहिल्या दिवशी जिथं थांबवण्यात आला होता त्याच ठिकाणावरुन खेळ पुन्हा सुरू होईल. उपांत्य फेरीचे सामने भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:०० वाजता खेळवले जातील. मात्र, जर सामना राखीव दिवशी हलवला गेला तर वेळ बदलली जाईल.



ऑस्ट्रेलियातील पर्थ येथे महिला राष्ट्रीय बास्केटबॉल लीग सामन्यात सहभागी होत पर्थ लिंक्स आणि टाउन्सविले फायरमधील खेळाडू.

# सलमान आगासह खेळाडूंवर लावला ५० लाखांचा दंड!

दिल्ली-आयसीसी टी-ट्वेंटी वर्ल्ड कपमध्ये सर्वात हास्यास्पद कोणती टीम राहिली असेल तर ती म्हणजे पाकिस्तान... पाकिस्तान संघाला गेल्या काही वर्षात साडेसाती लागली आहे. लिंबूटिंबू संघासोबत पाकिस्तानला जिंकता येतंय पण मोठी टीम आली की पाकिस्तानच्या तोंडचं पाणी पळलं. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये देखील पाकिस्तानची तिच परिस्थिती पहायला मिळाली. मोठ्या नावांवर बाजूला ठेऊन पाकिस्तानने 'ब्रेक डान्स' करणारे खेळाडू आणले पण त्यांना विरोधी संघाच्या तालावर नाचावं लागलं. पाकिस्तान वर्ल्ड कपमधून बाहेर झाली अन् आता खेळाडूंच्या खिशाला मोठी कात्री लागली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने मोठा निर्णय घेतलाय.

टी-२० वर्ल्ड कपमधील खराब कामगिरीचा फटका पाकिस्तानच्या खेळाडूंना आता आर्थिकदृष्ट्या बसणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, वर्ल्ड कप खेळणाऱ्या पाकिस्तानच्या प्रत्येक खेळाडूवर ५० लाख पाकिस्तानी रुपये (सुमारे १६ लाख भारतीय रुपये) इतका मोठा दंड ठोठावण्यात आला आहे. ही दंडाची रक्कम खेळाडूंच्या सॅलरी किंवा मॅच फीस मधून थेट कापली जाणार असून, पीसीबी स्वत: ही वसुली करणार आहे.

सलग चौथ्या आयसीसी टूर्नामेंटमध्ये पाकिस्तानची टीम सेमीफायनलपर्यंत पोहोचू शकली नाही, त्यामुळे बोर्डाने आता कडक पावलं उचलली आहेत. खराब कामगिरी केल्यास थेट आर्थिक नुकसान सोसावं लागेल, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला होता. पाकिस्तान क्रिकेटमध्ये यापूर्वीही कामगिरीवरून टीका झाली आहे, परंतु एवढ्या मोठ्या रकमेचा दंड लावण्याची ही पहिलीच वेळ असल्याने सर्वत्र याची चर्चा होत आहे.

पाकिस्तानने आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळले होते, जिथं त्यांना घरच्या मैदानासारखी परिस्थिती उपलब्ध होती, तरीही त्यांना त्याचा फायदा उठवता आला नाही. सुरुवातीच्या मॅचमध्ये त्यांनी नेदरलँड्सवर ३ विकेट्स राखून विजय मिळवला, पण तो विजय मिळवतानाही त्यांची दमछाक झाली होती. मात्र, टीम इंडियाविरुद्ध झालेल्या महत्त्वाच्या मॅचमध्ये पाकिस्तानला ६१ रन्सनी मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला.दरम्यान, वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानच्या टीममधील कमकुवतपणा जगासमोर उघड केला. या मोठ्या पराभवानंतरही पाकिस्तानची टीम कशी बशी सुपर-८ मध्ये पोहोचली होती, पण तिथेही त्यांना आपला प्रभाव पाडता आला नाही आणि त्यांचा स्पर्धेतील प्रवास संपला. त्यामुळे आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने खेळाडूंना धडा शिकवण्यासाठी असा निर्णय घेतला असावा, असं मानलं जातंय. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने याची अधिकृत घोषणा अद्याप केली नाही.

दरम्यान, टी-ट्वेंटी वर्ल्ड कपमध्ये ज्या संघाना सेमीफायनलमध्ये प्रवेश मिळाला नाही, ज्यांना सुपर ८ मधून बाहेर पडावं लागलं, अशा चार टीम्सला म्हणजेच पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे आणि संभाव्य वेस्ट इंडीज यांना आयसीसीकडून समसमान रक्कम मिळणार आहे. सुपर ८ मधून बाहेर झालेल्या संघांना ३ लाख ८० हजार

# अरे बस्स कर, मला रडवतोस काय आता!, संजू सॅमसनची



सूर्याच्या वक्तव्यावर भन्नाट प्रतिक्रिया, तखऊएज होतोय व्हायरल

डीीूरर्ज्ञीीरी धरवर्ीं ेप डरपर्क्षी डरीप:

सूर्यकुमार यादवने सामन्यानंतर संजू सॅमसनचं कौतुक करणारा खास व्हीडिओ शेअर केला आहे. सूर्याने केलेलं कौतुक ऐकल्यानंतर संजूच्या प्रतिक्रियेने सर्वांचं लक्ष

संजू सॅमसनच्या ९७ धावांच्या खेळीच्या बळावर टीम इंडियाने वेस्ट इंडिजला पराभवाचं पाणी पाजत सेमीफायनलमध्ये धडक मारली. सलामीला उतरलेला संजू सॅमसन संघाला विजय मिळवून देत नाबाद माघारी परतला. संजूने या खेळीदरम्यान संयमाने खेळत आणि प्रसंगी आक्रमक फटके खेळत संघाला विजयापर्यंत नेलं. त्याच्या या खेळीनंतर कर्णधार सूर्याने त्याच्यासमोर झुकत त्याचं कौतुक केलं. बीसीसीआयने शेअर केलेल्या व्हीडिओमध्ये देखील सूर्याने संजूचं खास कौतुक केलं आहे.

सूर्यकुमार यादवने बीसीसीआयने शेअर केलेल्या या व्हीडिओमध्ये संजू सॅमसनचं इतकं कौतुक केलं की अखेर संजूला कर्णधाराला थांबण्याची विनंती करावी लागली, नाहीतर मी रडायलाच लागेन, अशी प्रतिक्रियाही सॅमसनने दिली. या सामन्यात सॅमसनने ५० चेंडूत ९७ धावांची शानदार खेळी करत टी-२० विश्वचषकात यशस्वी धावांचा पाठलाग करताना भारतासाठी सर्वाधिक धावांचा विक्रम आपल्या नावावर केला. याआधी हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता.

सूर्या संजू सॅमसनबद्दल नेमकं काय म्हणाला?

बीसीसीआयने शेअर केलेल्या व्हीडिओमध्ये सूर्यकुमार यादवने संजू सॅमसनचं खूप कौतुक केलं. तसेच, कॅम्पदरम्यान संजू सॅमसनने संघाला काय संदेश दिला होता, हेही त्याने उघड केलं.

मी नेहमी म्हणतो, चांगल्या माणसांसोबत चांगल्या गोष्टी योग्य वेळी घडतात. त्याच्यासारख्या खेळाडूसाठी यापेक्षा चांगला क्षण किंवा मोठं व्यासपीठ असू शकत नाही. संघाला ज्या गोष्टीची गरज होती, त्यासाठी तो पुढे आला. संघात परत आल्यानंतर आम्ही सगळे बसलो तेव्हा त्याने पहिल्यांदा एवढंच सांगितलं होतं, 'आपल्याला जे हवं आहे ते नाही, तर संघाला जे हवं आहे ते करूया,'ङ्क असं सूर्यकुमारने त्याच्याबद्दल म्हटलं.

वेगळ्या क्रमांकावर फलंदाजी करावी लागली आणि पुन्हा त्याच जागेवर परत आला, हे सगळं सोपं नव्हतं. पण विश्वचषक जिंकणं कधीच सोपं नसतं. आयसीसी स्पर्धांमध्ये सामने धाडसी खेळाडू जिंकून देतात आणि ही तशीच धाडसी खेळी होती. चांगली सुरुवात मिळाल्यावर तो सहज आक्रमक फटकेबाजी शकला असता, पण त्याने एक बाजू सांभाळली, संघाला शेवटपर्यंत नेलं. त्याला सर्व श्रेय मिळायलाच हवं.

बुमराहने सांगितला भारताच्या विजयाचा खरा टर्निंग पॉईंट, संजू नव्हे तर 'या' खेळाडूचे दोन चौकार ठरले निर्णायक

सूर्या पुढे म्हणाला, मी त्याच्यासाठी, त्याची पत्नी आणि कुटुंबासाठी, तसेच त्याच्यावर प्रेम करणाऱ्या आणि पाठिंबा देणाऱ्या सर्वांसाठी खूप आनंदी आहे. आपण आता लक्ष्याच्या आणखी एक पाऊल जवळ आलो आहोत. आशा आहे, ही कामगिरी अशीच सुरू राहील. मला अजून बरंच काही सांगायचं आहे, पण मी खूप आनंदी आहे. तो यासाठी पूर्णपणे पात्र आहे,ङ्क असे सूर्यकुमार म्हणाला.

# छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाच्या खर्चात महावितरणमुळे प्रती किलोवॅट १५ हजाराची बचत, वीज ग्राहकांचा फायदा

**मुंबई/प्रतिनिधी :** महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या स्मार्ट योजनेसाठी महावितरणने मागविलेल्या टेंडरमध्ये एक किलोवॅट क्षमतेच्या छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाची किंमत सुमारे ४५ हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे. सध्या सौरऊर्जा पुरवठादार आकारत असलेल्या साठ हजार रुपये या दराच्या तुलनेत नवा दर १५ हजार रुपये कमी असल्याने योजनेच्या लाभार्थी ५ लाख छोट्या ग्राहकांची खूप मोठी बचत होणार आहे. तसेच साठ हजारच्या ऐवजी ४५ हजार रुपयात एक किलोवॅटचा छतावरील सौरऊर्जा बसविता येत असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे आगामी काळात असे प्रकल्प बसविणाऱ्या सर्व गरजू ग्राहकांना लाभ होणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गरीब ग्राहकांसाठी स्मार्ट योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी महावितरणला अंमलबजावणी यंत्रणा म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी मुंबईत झालेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत स्मार्ट योजनेच्या टेंडरला मान्यता देण्यात आली. बैठकीस राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला उपस्थित होत्या.

राज्य सरकारच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार (स्मार्ट) योजनेच्या शासननिर्णयात प्रति किलोवॅट पन्नास हजार रुपये खर्च गृहित धरला आहे. सध्या व्यवहारात सोलर पुरवठादार व्यावसायिक ग्राहकांकडून प्रती किलोवॅट सुमारे साठ हजार रुपये आकारत आहेत. पण महावितरणने आज मंजूर केलेल्या टेंडरमध्ये प्रती किलोवॅट ४५,४५० रुपये इतकी रक्कम स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेत ग्राहकाने भरायच्या हिश्श्याच्या रकमेत आता मोठी कपात होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून फेब्रुवारी २०२४ मध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू करण्यात आली आहे. यामध्ये घरगुती वीज ग्राहकांना छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी एक किलोवॅटला तीस हजार रुपये, दोन किलोवॅटला साठ हजार रुपये व तीन किलोवॅटला ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते. ऊर्वरित खर्च ग्राहकाने करायचा असतो. एक किलोवॅटच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. ग्राहकाच्या गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य येते व ग्राहकाला अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने या योजनेत राज्यातर्फे आणखी अनुदान देऊन दारिद्र्य रेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पाच लाख ग्राहकांसाठी स्मार्ट योजना आणली आहे. प्रत्येकी एक किलोवॅटचे सौरऊर्जा प्रकल्प या योजनेत बसविण्यात येतील.

महावितरणने स्मार्ट योजनेसाठी मागवलेल्या टेंडरमध्ये एक किलोवॅटच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी ४५,४५० रुपये इतका कमी दर निश्चित झाल्यामुळे आता अन्य गरजू वीज ग्राहकांनाही लाभ होणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत सरकारी अनुदानाशिवाय ऊर्वरित रक्कम ग्राहकाला भरावी लागते. या रकमेत मोठी घट झाल्यामुळे छोट्या गरजू वीज ग्राहकांना योजनेचा लाभ घेणे अधिक सोपे होईल.

सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या सूचिबद्ध पुरवठादारांची यादी महावितरणने आपल्या वेबसाईटवर आणि स्मार्ट योजनेच्या पोर्टलवर उपलब्ध केली आहे.

## दयानंद विज्ञानमध्ये विज्ञान मंडळाच्या वतीने वैज्ञानिक निबंध लेखन स्पर्धा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विज्ञान मंडळ- २०२५-२६ च्या वतीने वैज्ञानिक निबंध लेखन स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आलेले होते.या स्पर्धेचा मुख्य विषय असा होता की, राष्ट्रनिर्मितीत विज्ञानाची भूमिका, शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान, आधुनिक जीवनावर विज्ञानाचा प्रभाव, मानवकल्याणासाठी विज्ञानातील नवकल्पना, विज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे भविष्य विद्यार्थ्यांना माहीत करून देणे हा होता. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली.या स्पर्धेचे समन्वयक प्रा.एस. बी. गावित होते, तर डॉ.शंकर बिराजदार व डॉ.अमोल ठोसर यांनी निबंधाचे परीक्षक म्हणून काम पाहिले. तसेच स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विज्ञानाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती, शाश्वत विकास, आधुनिक जीवनातील विज्ञानाचा प्रभाव तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे भविष्य या विषयांवर अभ्यासपूर्ण आणि चिंतनशील मते मांडली. विद्यार्थ्यांच्या लेखनातून वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकी स्पष्टपणे दिसून आली. तसेच याप्रसंगी डॉ. श्वेता लोखंडे, प्रा. पूजा नंदगावे, प्रा. ऐश्वर्या अंधारे उपस्थित होते.या स्पर्धेसाठी विज्ञान मंडळाचा सचिव ओंकार चव्हाण,संयुक्त सचिव वीणा भंडारी, खजिनदार प्रज्वल लामतूरे, सदस्य ओंकार कापसे, वैभवी मार्डीकर, सृष्टी सूर्यवंशी यांचेही सहकार्य लाभले.

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू यांच्या हस्ते नोबेल पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावर्षी 'विज्ञानातील महिला : विकसित भारत उत्प्रेरक' या थीमनुसार विज्ञान विभागातर्फे विशेष प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. महिला संशोधकांचे कार्य, त्यांचे योगदान तसेच अलीकडील काळातील विविध विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन यांची माहिती या प्रदर्शनीत सादर करण्यात आली. या प्रदर्शनीचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले.दर्शन देशपांडे सर यांनी स्वलिखित विज्ञान गीत सादर केले. यावेळी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे, प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी, विज्ञान विभाग प्रमुख मंजुषा भोसले, रेश्मा काळे, चिन्मयी पाटील, मंजुषा गुडपल्ले, अमिता पाठक, उल्का मोरे, जस्मिन शेख, प्रेरणा कडतने, श्रीनिवास पांचाळ, बी के भालेराव, आशिद बनसोडे संदीप केंद्रे, तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

## श्री शिवाजी माध्यमिक विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत ३१ विद्यार्थी उत्तीर्ण

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय सरस्वती कॉलनी लातूर च्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादीत केले आहे. एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण होऊन विद्यालयातील तब्बल ३१ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्रता झाले आहेत.विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या कष्टाची जोड आहे. सोबतच पालकांनी दाखवलेला विश्वास व दिलेली साथ यामुळे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत व दैदिप्यमान यश संपादन करता आले, अशी प्रतिक्रिया विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जे.व्ही. पाटील यांनी दिली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयातील विषय शिक्षक सूर्यवंशी एस. एस., शेख एच.सी., सौ. चामवड ए. बी., सौ. घाडगे के. एस., सौ राजपूत जी. बी., सौ कवडे जी.सी. यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षकांनी वेळोवेळी सराव परीक्षा, जादा तास आणि वैयक्तिक मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली होती. असे ही त्यांनी यावेळी सांगीतले.विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र रामराव पाटील, व्यवस्थापकीय संचालक शेषराव रावसाहेब मोहिते पाटील (सिंगनाळकर) उपाध्यक्ष डॉ. उदय शेषराव मोहिते पाटील, सचिव अजय रामचंद्र जाधव, कोषाध्यक्ष बालाजी दिगंबरराव पौळ, संचालिका सौ. मेघाताई जाधव व सर्व संचालक मंडळ व विद्यालयाचे मुख्याध्यापिका सौ. पाटील जे. व्ही., उपमुख्याध्यापक गुरमे बी आर, पर्यवेक्षक तोगरे ए.पी., भोपे व्ही. ऐस., पाटे डी एन., घोरपडे पी.एम. यांनी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक केले आहे.

## विद्युत मंडळ अधिकारी संघटनेचे ४८ वे वार्षिक अधिवेशन उत्साहात संपन्न

### नूतन अध्यक्षपदी दिनेश लडकत, सरचिटणीसपदी डॉ. शिवाजी तिकांडे तर सहसचिवपदी दिनेश ठाकूर

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेचे ४८ वे वार्षिक अधिवेशन लातूर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी मोठया उत्साहात पार पडले. यात संघटनेची नूतन कार्यकारिणी लोकशाही मार्गाने निवडण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी दिनेश लडकत (पुणे) तर सरचिटणीसपदी डॉ शिवाजी तिकांडे (छत्रपती संभाजीनगर) हे मोठया मताधिक्क्याने निवडून आले. सोबतच लातूर मंडळाच्या वित्त व लेखा विभागाचे उपव्यवस्थापक दिनेश ठाकूर हे सहसचिवपदी निवडून आले.

उर्वरित कार्यकारिणी : संघटन सचिव- प्रविण गायकवाड (छत्रपती संभाजीनगर) कोषाध्यक्ष - प्रमोद कांबळे (अमरावती), कार्याध्यक्ष- महेश जाधव (महावितरण, नागपूर), नितीन सूर्यवंशी (महानिर्मिती, कोराडी), उपसरचिटणीस - विकास बांबल (महावितरण, अमरावती), नंदकिशोर सातकर (महानिर्मिती, खापरखेडा), सहसचिव- ऋषिकेश गायकवाड (बारामती), संतोष आडुळकर (सोलापूर), अनंत ठवकर (कोराडी), महिला प्रतिनिधी - शिल्पा बारापात्रे (नागपूर), आद्यश्री कांबे (अमरावती), श्रध्दा पोवार







(मुंबई). महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तिन्ही शासकीय वीज कंपन्यांतील सर्व अतांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन कार्यकारिणी अधिक जोमाने प्रयत्न करेल, असे नवनिर्वाचित सरचिटणीस डॉ.शिवाजी तिकांडे यांनी सांगितले.

पदभार स्विकारताच सरचिटणीस डॉ शिवाजी तिकांडे म्हणाले की, महावितरण, महापारेषण व महानिर्मिती व सूत्रधारी कंपनी अंतर्गत वित्त व लेखा, मानव संसाधन, माहिती व तंत्रज्ञान, औद्योगिक संबंध, जनसंपर्क, विधी, सुरक्षा व अंमलबजावणी आदी विभागातील अधिकाऱ्यांचे ही संघटना प्रतिनिधित्व करते. तिन्ही वीज कंपन्यांतील अधिकाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन कार्यकारिणी अधिक जोमाने प्रयत्न करेल. महावितरण कंपनीस आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रशासनास सर्वोतोपरी मदत करणे आदी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून येणाऱ्या काळामध्ये कामकाज करण्याचा मानस असल्याचे सरचिटणीस डॉ. शिवाजी तिकांडे यांनी सांगितले.

अधिवेशन यशस्वी करण्यासाठी अजय गुळवे, लातूर परिमंडळ कार्यकारिणीचे अध्यक्ष रामानंद पडवळ, सचिव दिनेश ठाकूर, अभिजीत ढाकणे, रोहीत चव्हाण, अजित जैन, मनोज पेठकर,उमेश काळे, गजानन लव्हराळे, संतोष महापुरे, दिलीप अकोसकर, महादेव सुडे, सविता पवार तसेच सल्लागार श्री चेतन वाघ, जालिंदर मंगळवेढेकर यांच्यासह लातूर परिमंडल कार्यकारिणीच्या सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

## महावितरणचे अध्यक्ष श्री. लोकेश चंद्र यांचा नॅशनल लीडरशिप अवॉर्ड २०२६ ने गौरव

**मुंबई/प्रतिनिधी** :महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांचा शुक्रवारी (दि. २७) आयोजित यंदाच्या नॅशनल लिडरशिप परिषदेमध्ये 'इंडियाज बिझीनेस लिडर ऑफ एक्सलेन्स अवॉर्ड-२०२६' या पुरस्काराने गौरव करण्यात आला.



मुंबई येथील स्टॉक एक्सचेंजच्या इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉलमध्ये टाइम्स एस्पायर या संस्थेच्या वतीने नॅशनल लिडरशिप शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत संस्थात्मक उत्कृष्ट नेतृत्व, पर्यावरण व शाश्वत ऊर्जा, नाविन्यपूर्ण उपक्रम, कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान आदींवर सादरीकरण व चर्चा करण्यासाठी देशातील खासगी व सरकारी विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांना जाहीर झालेला पुरस्कार त्यांच्यावतीने संचालक (संचालन) श्री. सचिन तालेवार, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांनी स्वीकारला.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिर्वतन सुरु आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. यामध्ये महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ८२ गिगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी 'मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०' व 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजना अत्यंत उपयुक्त ठरत आहे. या दोन्ही योजनेतून सध्या १८ लाख ८२ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरु झाला आहे.

महावितरणकडून विजेच्या मागणीचा अंदाज व त्याचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे विश्लेषण करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्याद्वारे मागणीचा अचूक अंदाज व सर्वात कमी खर्चात वीज खरेदीचे व्यवस्थापन सुरू आहे. यासह ऊर्जा क्षेत्रातील विविध योजना, डिजिटल ग्राहकसेवेचे प्रभावी व्यवस्थापन व नाविन्यपूर्ण नेतृत्वासाठी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांची या पुरस्कारासाठी निवड झाली.

## नगराध्यक्ष सौ.नेहा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्मशानभूमीत स्वच्छतेचा संकल्प पूर्ण; दत्ता पेठे यांच्या पुढाकारातून यशस्वी श्रमदान मोहीम

**धाराशिव/प्रतिनिधी :** धाराशिव शहरात क्रांतीवीर फकिरा राघोजी साठे यांच्या जयंतीनिमित्त दि. १ मार्च २०२६ रोजी मातंग समाज स्मशानभूमी येथे भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मातंग समाज व धाराशिव नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम पार पडली.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून शहर स्वच्छतेचा व्यापक उपक्रम हाती घेण्यात आला असून, त्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरवत धाराशिव नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. त्याच अनुषंगाने मातंग समाज स्मशानभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली.

या उपक्रमासाठी दत्ता (तात्या) पेठे यांच्या मार्गदर्शनाखाली समाजबांधवांनी मोठ्या उत्साहात श्रमदान केले. स्मशानभूमी परिसरातील गवत, कचरा व साचलेली घाण काढून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. नगरपरिषदेच्या वतीने दोन ट्रॅक्टर, एक जेसीबी मशीन तसेच महिला व पुरुष सफाई कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली.

उप मुख्याधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक अभिजीत गोरे यांनी आवश्यक कर्मचारी व यंत्रसामग्री उपलब्ध करून देत मोहिमेला गती दिली. या अभियानाच्या यशस्वितेसाठी सुमेध क्षीरसागर, संतोष पेठे, संतोष शेरा पेठे, सचिन पेठे, अंकुश पेठे, नेताजी क्षीरसागर, पप्पू पेठे, सचिन वाघमारे, जय पेठे, वैभव पेठे, अलोक पेठे, ज्ञानेश्वर पेठे, ऐडके काका पेठे, कालिदास चव्हाण आदींनी विशेष परिश्रम घेतले.

नगराध्यक्ष नेहा काकडे यांनी स्वच्छतेला प्राधान्य देत शहर सुशोभिकरणासाठी विशेष मोहीम साबविण्यासाठी सुरुवात केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शहरातील विविध प्रभागामध्ये स्वच्छतेचे उपक्रम राबवले जात असून नागरिकांमध्येही सकारात्मक संदेश पहावयास मिळत आहे.

दत्ता पेठे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे स्मशानभूमी परिसर स्वच्छ व सुस्थितीत झाला असून, नागरिकांकडून समाधान



व्यक्त करण्यात येत आहे.

शहर स्वच्छतेच्या या संकल्पनेतून प्रशासन व समाज यांचा समन्वय दिसून आला असून, आगामी काळातही अशा उपक्रमांना अधिक बळ मिळून असे सामाजिक उपक्रम राबविण्यात यावेत अशी विनंती समाजबांधवरून करण्यात येत आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये मराठी राजभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. २७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू यांच्या हस्ते ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त थोर साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.



मराठी विभागातर्फे पाणी बचत, वृक्षारोपण व मुलगी वाचवा या विषयावर घोषवाक्य लेखन उपक्रम,दिवाळी सणाचे भित्तीपत्रक, शब्दपट्ट्या तयार करणे, अभंग गायन असे उपक्रम घेण्यात आले.

यावेळी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे, प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी, मराठी विभाग प्रमुख देवयानी कुलकर्णी, स्वरांजली देशपांडे, मनिषा मगर, स्वाती भोयरेकर, शीतल औटी, रंजना गिरी, पूनम सूर्यवंशी, बी के भालेराव, आशिद बनसोडे संदीप केंद्रे,सुनील मुनाळे उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# आदिवासी पारधी समाजातील गरजूंना शासकीय योजनांचा लाभ: विठ्ठल पवार यांना न्या. शैलेश ब्रम्हे यांच्या हस्ते ई-रिक्षाची चावी



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने १ मार्च रोजी धाराशिव येथील लेडीज क्लब येथे आयोजित विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्यात न्या. शैलेश ब्रम्हे यांच्या हस्ते आदिवासी पारधी समाजातील विठ्ठला भारत पवार यांना इ- रिक्षा देण्यास आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा न्या.श्रीमती अभिश्री देव, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष,पोलिस अधीक्षक श्रीमती.रितू खोखर,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.श्रीमती भाग्यश्री पाटील व जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड.अमोल वरुडकर, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे यांची उपस्थिती होती.

महामेळाव्यात आदिवासी घटकातील गरजू लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळाला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कारखान्याचे गळीत हंगाम २०२५-२०२६ सांगता समारंभ



धाराशिव (प्रतिनिधी)-केशेगाव (ता. धाराशिव )येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२५-२०२६ चा सांगता समारंभ निमित्त गव्हाण पूजन कारखान्याचे संचालक मा. काकासाहेब केदार यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थापक चेअरमन मा. श्री. अरविंद गोरे होते.

शनिवार (ता. २८)डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२०२६ सांगता समारंभ कार्यक्रमाचेवेळी प्रस्ताविकपर भाषणात कारखान्याचे शेतकी अधिकारी श्री. शिनगारे यांनी यावर्षी कारखान्याने ५, १०, ०००मे. टन गाळप केल्याचे सांगितले व यापुढेही वाहन यंत्रनेचे असेच सहकार्य मिळावे ही अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचेवेळी मार्गदर्शनपर भाषणात कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा. अरविंद गोरे यांनी यावर्षी कारखाण्याचा २२ वा गळीत हंगाम सर्वांच्या प्रयत्नातून यशस्वीपणे पार पडला. यावर्षी पाऊस जास्त झाल्याने सरासरी टनेज कमी झाले, तसेच इतर कारखाने, खांडसऱ्या चालू असल्याने हंगाम फेब्रुवारी अखेर बंद झाला. यापुढे हंगाम चार महिने चालेल, अशा परिस्थितीत कमी दिवसात कारखाना बंदचे प्रमाण कमी करून जास्तीत जास्त कसे करता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच यापुढे हंगाम सुरु करताना १५ नोव्हेंबरच्या पुढे चालू करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील वर्षात कारखाना ७० टक्के हार्वेस्टर व ३० टक्के मोळीचे वाहनाची भरती करण्याचे नियोजन आहे. शासनाने एफआरपी प्रत्येक वर्षी वाढवली परंतु साखरेचे दर वाढवले नाहीत, अशा परिस्थित शासनाचे सहकार्य असणे फार गरजेचे आहे. सध्या कृत्रीम बुद्धिमत्ता (-ळ) तंत्रद्यानाचा वापर करून कमी क्षेत्रात जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल या द्रष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करने गरजेचे आहे. शेतकऱ्यांना होणारा त्रास कमी कसा करता येईल याद्रष्टीने सर्व ऊस तोडणी /वाहतूक ठेकेदार यांनी सहकार्याची भूमिका घ्यावी.

तसेच या वर्षी हार्वेस्टर मालक श्री शेटे नंदकुमार यांनी शेतकऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची रक्कम न घेता ऊस तोड केली. या बाबीची दखल घेउन कारखाना संस्थापक अध्यक्ष मा. अरविंद गोरे यांच्या हस्ते शाल, फेटा, स्मृतीचिन्ह व रोख रक्कम ११, १००/- देऊन त्यांचा या विशेष पुरस्काराने कौतुक केले.

संचालक मा. ज्ञानेश्वर बाकले यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित असणारे कारखान्याचे संचालक मंडळ सदस्य,राजर्षी शाहू ट्रस्टचे विश्वस्थ,सर्व सभासद, ऊस तोडणी / वाहतूक ठेकेदार, कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी वर्ग, हितचिंतक यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन कारखान्याचे संचालक मा. ज्ञानेश्वर बाकले यांनी केले.

# चिमुकल्यांनी केले गोंधळगीत, लावणी, नाट्याचे सादरीकरण: खेड शाळेतील स्नेहसंमेलनात पालकांचा उत्स्फूर्त सहभाग



लोहाराधाराशिव (प्रतिनिधी)-लोहा-रा लोहारा तालुक्यातील खेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये गुरुवारी (दि.२६) संध्याकाळी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तालुक्यातील खेड जिल्हा परिषद शाळेत आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमासाठी आनंद पाटील, राजु तोरकडे, अमीन सुंबेकर, विजय ढगे, असलम सय्यद, विश्वजीत चंदनशिवे, विठ्ठल साठे, कमलाकर येणेगुरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांची प्रमुख उपस्थिती होती. या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी गोंधळ गीत, लावणी, कव्वाली, देशभक्तीपर गीत सादरीकरण तसेच स्वच्छ भारत, व्यसनमुक्तीपर आधारित नाटिका सादर करून प्रबोधन केले. प्रास्ताविक मल्लिकार्जुन कलशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन बळीराम आलमले यांनी तर राहुल भेडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक काकासाहेब इंगळे, मोईजुद्दीन सौदागर, प्रवीण शिंदे, सुरेश साळुंके, बळीराम आलमले, सुनंदा निर्मळे, राहुल भेडे, मल्लिकार्जुन कलशेट्टी यांच्यासह नागरिकांनी सहकार्य केले.

# शिबिराच्या माध्यमातून योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात–न्या.शैलेश ब्रम्हे

## विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा



धाराशिव दि.१ मार्च (जिमाका) विविध योजनांची अंमलबजावणी करणे हे कठीण व जिकरीची काम आहे.शासनाच्या विविध कल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या नाही,तर त्या कागदावरच राहतात.या महाशिबिराच्या माध्यमातून विविध योजना ह्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात.असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायमूर्ती.शैलेश ब्रम्हे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आज १ मार्च रोजी धाराशिव येथील लेडीज क्लब येथे आयोजित विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे उद्घाटन न्या.श्री.ब्रम्हे यांच्या हस्ते करण्यात आले.या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात न्या. श्री.ब्रम्हे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा न्या.श्रीमती अभिश्री देव,प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलिस अधीक्षक श्रीमती.रितू खोखर,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या. श्रीमती भाग्यश्री पाटील व जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ड.अमोल वरुडकर यांची उपस्थिती होती.

न्या.ब्रम्हे पुढे म्हणाले की,या महाशिबिरासाठी आलेल्या नागरिकांनी येथे लावण्यात आलेल्या प्रत्येक स्टॉलला भेट देऊन संबंधित विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना,अभियान व उपक्रमांची माहिती काळजीपूर्वक जाणून घ्यावी.आपल्याला कोणत्या योजनेचा लाभ मिळू शकतो त्याची माहिती घेऊन कागदपत्रांची पूर्तता करावी.केवळ स्वतःपुरत्याच या योजनांची माहिती जाणून न घेता आपल्या गावातील नागरीकांना, लाभार्थ्यांना तसेच आपल्या शेजाऱ्यांना या महामेळाव्यातून गावाला पोहोचल्यावर त्यांना योजनांची माहिती देऊन योजनांचा लाभ घेण्यात प्रोत्साहित करावे.योजनांच्या लाभामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.असे न्या.ब्रम्हे यांनी सांगितले.

विधी सेवा प्राधिकरण व प्रशासनाने या महाशिबिराच्या माध्यमातून योजनांची माहिती देणे व त्याचा लाभ मिळवून देण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे सांगून न्या.श्री.ब्रम्हे म्हणाले की, भारतीय संविधानाने सामाजिक व आर्थिक न्याय सांगितला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमातून भारतीय संविधानाची निर्मिती झाली आहे. संविधानाचा सर्वांनाच फायदा व्हावा यासाठी हे महाशिबिर आयोजित केले आहे.समाजातील सर्व नागरिकांना व लाभार्थ्यांना या शिबिराचा लाभ झाला पाहिजे.शिबिरातून मिळणारी माहिती नागरिकांनी आपल्या गावात घरोघरी पोहोचवून विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी न्या.श्री ब्रम्हे यांनी केले.

जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,नागरिकांना मोफत कायदेशीर मार्गदर्शन वेळोवेळी करण्यात येते. शासनाच्या अनेक योजना आहेत.त्या लोकांपर्यंत पोहचविणे व त्यांना योजनांचा लाभ मिळवून देणे हे आपले कर्तव्य आहे. कायदेविषयक शिबिराची माहिती ही नागरिकांनी शेजारच्या व्यक्तीला दिली पाहिजे,असे त्यांनी यावेळी सांगितले.

न्या.श्रीमती.देव म्हणाल्या की,हा लोकशाहीचा उत्सव आहे.या उत्सवाच्या माध्यमातून विधी सेवा आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. न्याय सर्वांसाठी हे विधी सेवा प्राधिकरणचे ब्रीद आहे.समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहावे,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मंचावरून न्या.ब्रम्हे यांच्या हस्ते लोककल्याणकारी योजनांच्या लाभाचे वितरण काही लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात करण्यात आले.यामध्ये सिमरन मुजावर या दिव्यांग विद्यार्थ्याला २० हजार रुपयांचे किसान विकास पत्र,अमोल कांबळे - प्रांजली तुपे यांना ५० हजार रुपयांचा आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य या योजनेचा धनादेश,प्रवीण शिंदे याला दिव्यांग कल्याण विभागाकडून बीज भांडवल कर्ज योजनेचा १ लक्ष रुपयांचा कर्ज मंजुरी आदेश,श्रीमती. रंजना ढवळे यांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलाची चाबी,सोनाली उघडे यांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून लखपती दीदी सन्मान प्रमाणपत्र,कालिदास शेंडगे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या नवीन विहिरीचा मंजुरी आदेश, नितीन कांबळे यांना पशुसंवर्धन विभागाकडून शेळी गट वाटप योजनेचे प्रमाणपत्र,सलीम शेख यांना रहिवासी प्रमाणपत्र,दादा घोडके यांना शिधापत्रिका व दिव्यांग लाभार्थी प्रमाणपत्र,सारिका भागवत यांना किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत शिवणकाम व्यवसाय प्रमाणपत्र,देवांशी काकडे या तृतीयपंथी व्यक्तीला समाज कल्याण विभागाचे तृतीयपंथी ओळखपत्र व विठ्ठल पवार यांना आदिवासी विकास विभागाकडून ई-रिक्षाची चावी देण्यात आली.

न्या.श्री.ब्रम्हे व अन्य मान्यवरांनी महामेळाव्यात लावण्यात आलेल्या विविध विभागाच्या स्टॉलला भेट देऊन विविध योजनांची माहिती जाणून घेतली व त्यांच्या हस्ते संबंधित स्टॉलवर देखील संबंधित विभागाच्या योजनांच्या लाभाचे व प्रमाणपत्राचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आले.

यावेळी विविध विभागातील अधिकारी यांनी महाशिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप सिंगुलवार,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,उपजिल्हाधिकारी श्रीकांत पाटील,कळंबचे उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती.साकळे,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे यांना भेटवस्तू,पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध न्यायालयाचे न्यायिक अधिकारी,जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी, बचतगटातील महिला लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षरोपिकांना जल अर्पण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती. अभिश्री देव यांनी केले. संचालन न्या.सचिन पाटील यांनी केले.आभार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.भाग्यश्री पाटील यांनी मानले.राष्ट्रगीत व राज्यगिताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# तीन महिन्यांत रस्ता करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित

धाराशिव शहरातील बोंबले हनुमान चौक ते जिजाऊ चौक रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात सामाजिक कार्यकर्ते दिनकर उर्फ दादासाहेब मुंडे यांनी जिजाऊ चौक येथे सुरू केलेले आमरण उपोषण अखेर पाचव्या दिवशी स्थगित करण्यात आले. नगरपालिकेने पुढील ३ महिन्यांत रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. रस्त्याप्रश्नी या पार्श्वभूमीवर मुंडे यांनी ५ दिवसांपूर्वी आमरण उपोषण सुरू केले होते. पाचव्या दिवशी त्यांची प्रकृती चिंताजनक झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी पसरली होती. प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखत मागणी मान्य केली. आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनीही फोनवरून संवाद साधत लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यापूर्वी सध्याचे भाजपचे नगरसेवक अभिजित पतंगे यांच्यासह अनेकांनी आंदोलने केली होती. नंतर आंदोलनाचे सत्र थांबले होते. यामुळे रस्त्याची दुरवस्था कायम होती. त्यावेळी अशाच प्रकारे आश्वासन देण्यात आले होते. आताही तीन महिन्याचे आश्वासन देण्यात आले आहे. आता पूर्वीप्रमाणे आश्वासनाचा विसर पडणार की, खरोखरच रस्ता होणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649